RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२५६ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.१५ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## विधानसभा अध्यक्षांना दिलासा; आमदार अपात्रतेसंदर्भात सर्वोच्च न्यायलायने दिली मुदतवाढ

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

शिवसेनेतील बंडखोरीनंतर आमदार अपात्रेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. त्यानुसार, विधानसभा अध्यक्षांच्या कोर्टात हे प्रकरण मार्गी लागणार आहे. त्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने ३१ डिसेंबरपर्यंत हे प्रकरण संपवून टाकण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्षांना दिले होते. त्यानुसार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रेची सुनावणी जलद गतीने घेतली आहे. मात्र, तरीही निकालासाठी ३ आठवड्यांची मुदतवाढ देण्याची मागणी राहुल नार्वेकर यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. न्यायालयाने मागणी मान्य



केली. पण, १० दिवसांचीच मुदतवाढ दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाकडे विधानसभा अध्यक्षांना शिवसेना आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात निकाल देण्यासाठी दिलासा दिला आहे. न्यायालय तीन आठवड्यांची मुदत देऊ शकत नाही, असे कोर्टाने म्हटले. मात्र, १० जानेवारीपर्यंतची मुदतवाढ सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. याप्रकरणी २० डिसेंबरपर्यंत संपूर्ण सुनावणी पूर्ण होणार आहे. त्यानंतर, हा निकाल राखून ठेवला जाईल. कारण, निकाल देण्यापूर्वी दोन्ही बाजुंचा दस्तावेज वाचून, अभ्यासून पाहावा लागणार आहे. त्यामुळे, निकालपत्र तयार करुन निकाल जाहीर करण्यासाठी वेळ लागणार आहे, अशी बाजू विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ३ आठवड्यांची मुदत वाढवून मागितली होती. मात्र, न्यायालयाने १० दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे, आता शिवसेना आमदार अपात्रतेवर १० जानेवारी किंवा तत्पूर्वी निकाल येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**शिवसेनेकडून अध्यक्षांच्या भूमिकेवर आक्षेप**

दरम्यान, आमदार अपात्रता सुनावणीवरील निर्णयासाठी विधानसभा अध्यक्षांनी वेळ वाढवून मागितला होता. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने ३१ डिसेंबरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत निर्णय द्या, अशा आदेशवजा सूचला केल्या होत्या. आता, न्यायालयाने अध्यक्षांच्या मागणी काही अंशी मान्य करत १० जानेवारीपर्यंत वेळ वाढवून दिला आहे. तत्पूर्वी, शिवसेना आमदारांकडून अध्यक्षांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. अध्यक्षांची भूमिका लक्षात घेतली तर त्यांना हे प्रकरण प्रलंबित ठेवायचे आहे. ३१ डिसेंबरपर्यंत ते निर्णय देऊ शकत नाहीत. याचा अर्थ अध्यक्षांची भूमिका सुसंगत नाही, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी शुक्रवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलताना केली.

## भजनलाल यांनी घेतली राजस्थानच्या मुख्यमंत्री पदाची शपथ

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक जयपूर**

भजनलाल शर्मा हे राजस्थानचे नवे मुख्यमंत्री झाले आहेत. जयपूर येथील अलबर्ट हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राज्यपाल कलराज मिश्र यांनी भजनलाल शर्मा यांना मुख्यमंत्री पदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली. महत्वाचे म्हणजे आजच भजनलाल यांचा वाढदिवसही आहे. भजनलाल यांच्या समवेत दोन उपमुख्यमंत्री दिया कुमारी आणि प्रेमचंद बैरवा यांनीही शपथ घेतली.




यावेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय गृह मंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, पीयूष गोयल, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मध्य प्रदेशचे नवे मुख्यमंत्री मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, वसुंधरा राजे, अर्जुनराम मेघवाल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आदी उपस्थित होते.

राजस्थानात २०० पैकी १९९ जागांवर मतदान झाले होते. एका जागेवर उमेदवाराच्या निधमामुळे निवडणूक होऊ शकली नव्हती. यांपैकी, भाजपने ११५ जागांवर विजय मिळवला आहे. तर, काँग्रेसला ६९ जागा मिळाल्या आहेत.

भजनलाल हे पहली भरतपूर येथील आहेत आणि पहिल्यांदाच आमदार झाले आहेत. त्यांच्या नावाची मंगळवारी पक्षाचे केंद्रीय पर्यवेक्षक राजनाथ सिंह, सरोज पांडे आणि विनोद तावडे यांच्या उपस्थितीत भाजप विधीमंडळ पक्षाच्या बैठकीत मुख्यमंत्री म्हणून घोषणा करण्यात आली.

## अनेक मोठे मोठे लोक अंगावर घेतले .... तू किस झाड की पत्ती, छगन भुजबळांची मनोज जरांगेवर टीका

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

गेल्या काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापले आहे. आरक्षणावरून मंत्री छगन भुजबळ आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यात वाकयुद्ध होताना पाहायला मिळत आहे. गावबंदीमुळे आमदार खासदार यांना गावात जाण्यापासून मज्जाव करण्यात आला आहे.



त्यांना काम करू दिले जात नव्हते. हा गुन्हा आहे याला एक महिन्याची शिक्षा देखील आहे. या तारखेपर्यंत द्या आणि त्या तारखेपर्यंत द्या म्हणजे ब्लॅकमेलिंग नाही तर आणखी काय आहे? सरकारने तीन तीन न्यायाधीश बसवले आहे वाट पाहा, असा सल्ला देत मी अनेक मोठे मोठे लोक अंगावर घेतले आहेत. तू किस झाड की पत्ती आहे, असे म्हणत छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीकास्त्र सोडले.

आम्ही गप्प बसायचं, मग त्यांनी जाळपोळ करायची. बीडमधील जाळपोळ ठरवून करण्यात आल्याचा आरोप छगन भुजबळ यांनी केला. २४ डिसेंबरचा सरकारवर दबाव टाकण्यात येत आहे. झुंडशाहीला, दादगिरीला माझा विरोध आहे. समाज माध्यमावरील मेसेजही वाचून दाखवला आहे. प्रकाश सोळंकी, संदीप क्षीरसागर यांची घरं जाळली त्याप्रमाणेच माझंही घर जाळलं जाईल भुजबळांनी भीती व्यक्त केली आहे. मराठा आरक्षणासाठी सरकार प्रयत्न करत आहे. बीडमध्ये अनेकांची घरं, कार्यालय ऑफिस कट करून पेटवण्यात आली. यात जीवितहानी होण्याची शक्यता आहे मात्र ते वाचले, असे छगन भुजबळ म्हणाले.

याचबरोबर, काही नेत्यांनी छगन भुजबळ यांच्या भूमिमेकवर भाष्य केले आहे. यावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, एकदा ओबीसीमध्ये आल्यानंतर शैक्षणिक आणि राजकीय आरक्षण लागू होणार आहे. ओबीसीमध्ये आलात तर त्याला सर्व लाभ मिळतात. या विषयावर नेते बोलायला घाबरतात. याचे मुख्य कारण निवडणूक आहे. प्रत्येकला वाटत आहे, विरोधात बोलले तर मराठा समाजाचे मत मिळणार नाही, म्हणून भुजबळ यांच्या विरोधात बोला, असे छगन भुजबळ म्हणाले. याशिवाय, माझे वय ७६ वर्षे आहे. गेली ३५ वर्ष ओबीसीसाठी काम करत आहे. मी जेव्हा राजकारणात आमदार होतो तेव्हा फडणवीस नव्हते. कोणी मला सांगावे अशी परिस्थिती नाही, माझे निर्णय माझे असतात आणि परिणाम भोगण्याची माझी तयारी आहे, असेही छगन भुजबळ म्हणाले.

## ४ फोनसह सर्व पुरावे नष्ट करून मास्टरमाइंड ललितने केलं सरेंडर; संसदेतील घुसखोरीमागे मोठा कट?

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेतील घुसखोरीचा संपूर्ण कट रचणारा मास्टरमाइंड ललित झा याने दिल्ली पोलीस ठाण्यात सरेंडर केलं आहे. संसदेच्या आत जाऊन निदर्शने करणाऱ्या चारही लोकांचे मोबाईल घेऊन ललित झा पळून गेला होता. तपासात देखील हेच समोर आलं आहे, मात्र आता त्याच्या सरेंडरनंतर पोलिसांना ललित आणि महेशकडे एकही मोबाईल सापडला नाही.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राजस्थानहून दिल्लीत येऊन सरेंडर करण्यापूर्वी ललितने तेथेच चारही मोबाईल नष्ट केले. दिल्लीतून पळून गेल्यानंतर ललित कुचामन येथे गेला होता, जिथे तो त्याचा मित्र महेशला भेटला. महेशनेच ललितला रात्री राहण्यासाठी एक खोली मिळवून दिली.



मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी संसद भवनात घडलेल्या घटनेनंतर ललितने गुरुवारी सकाळीच सर्व फोन नष्ट केले होते. मात्र, पोलिसांचा ललितच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास नाही आणि ते याचा तपास करत आहेत. या घटनेने खळबळ उडाली आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

संसदेत दोन आरोपींनी स्मॉग कॅनचा वापर केला होता, तर बाहेरही दोन लोकांनी स्मॉग कॅनमधून रंगीत धूर मारत घोषणाबाजी केली. पोलीस आता कोणत्याही परिस्थितीत चार आरोपींचे फोन शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. स्पेशल सेलची टीम आज महेश आणि ललितला कोर्टात हजर करून रिमांड मागणार आहे. यापूर्वी अटक करण्यात आलेल्या चार आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

तपासात अडथळे आणण्यासाठी ललित खोटं बोलत असल्याचा पोलिसांना संशय आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिल्ली पोलिसांनी महेशच्या चुलत भावाला चौकशीसाठी ताब्यात घेतले होतं. त्याचवेळी महेश आणि ललित सरेंडर करण्यासाठी दिल्लीत येत असल्याची माहिती दिल्ली पोलिसांना मिळाली.

संसदेत जाण्यापूर्वी आणि आंदोलन करण्यापूर्वी मनोरंजन, सागर, नीलम आणि अमोल यांनी ललित झा याच्याकडे फोन ठेवला होता. ललित झा बाहेरच्या गर्दीत सामील होऊन त्यांचे व्हिडिओ रेकॉर्ड करत होता. पोलिसांनी चार आरोपींना पकडताच ललित झा सर्वांचे मोबाईल घेऊन तेथून पळून गेला.

### घुसखोरी करण्याचं प्लॅनिंग जवळपास दीड-दोन वर्षापूर्वीचं

देशाच्या संसदेच्या सुरक्षेत अक्षम्य अशी चूक घडली आणि काही जणांनी सभागृहात घुसखोरी केली. मात्र हा प्लान दीड ते दोन वर्षांपूर्वी करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. संसदेत घुसखोरी करण्याचं प्लॅनिंग जवळपास दीड-दोन वर्षांपूर्वी केल्याचं समजतं. सोशल मीडियावर ओळख झाल्यानंतर सगळ्यांची पहिली एकत्रित बैठक मनोरंजनच्या कर्नाटकातील मैसूरमधील घराजवळ झाली. इथेच बेरोजगारी आणि इतर महत्वाच्या विषयांवर सरकारला जागं करण्यासाठी काही तरी मोठं करण्याचा प्लॅन त्यांनी केला. १३ डिसेंबर तारीख निश्चित केल्यांनतर सर्व जण १० तारखेपर्यंत दिल्लीला पोहोचले. तीन दिवस शर्माच्या घरी राहिल्यानंतर १३ तारखेला सकाळी सर्व जण संसद परिसराजवळ पोहोचले. फक्त दोन पास मिळाल्यामुळे मनोरंजन आणि सागर शर्मा संसदेच्या आत गेले आणि ही घटना घडवून आणली.

## आदित्य असं काही करेल वाटत नाही; दिशा सालियान प्रकरणी शर्मिला ठाकरेंची प्रतिक्रिया



**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियान आत्महत्येप्रकरणी राज्य सरकारकडून विशेष चौकशी समिती (एसआयटी) नेमण्याचे आदेश देताच, मुंबई पोलिसांनी मंगळवारी एसआयटी स्थापन केली आहे. अपर पोलिस आयुक्त उत्तर विभाग राजीव जैन हे एसआयटीचे नेतृत्व करणार आहेत. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंतच्या दिशा सालियान आत्महत्या प्रकरणात समोर आलेल्या बाबी, तसेच कागदपत्रांची पुन्हा पडताळणी करण्यात येत आहे. यातून आवश्यक वाटल्यास संबंधितांना चौकशीसाठी बोलावण्यात येईल. त्यानुसार, एसआयटी पथक तपास करत आहे. दिशा सालियान आत्महत्या प्रकरणात राजकीय आरोप-प्रत्यारोप झाले होते. यावर आता मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एका कार्यक्रमात उपस्थित असताना पत्रकारांनी आदित्य ठाकरेंच्या एसआयटी चौकशीबाबतच्या प्रश्न विचारला. यावर आदित्य असं काही करेल, असं वाटत नाही. चौकशा होत राहतात. आम्ही देखील यातून गेलो आहोत, असं शर्मिला ठाकरे म्हणाल्या.

## मुंबई बॉम्बस्फोटातला आरोपी सलीम कुत्तासोबत ठाकरे गटाच्या सुधाकर बडगुजरांची पार्टी

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा सहकारी सलीम कुत्ता याच्यासोबत ठाकरे गटाचे सुधाकर बडगुजर यांनी पार्टी केल्याचा आरोप नितेश राणेंनी केला आहे. सलीम कुत्ता हा मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातला प्रमुख आरोपी आहे, तो पॅरोलवर असताना बडगुजर यांनी ही पार्टी केली असा आरोप नितेश राणेंनी केलाय. या पार्टीचे फोटोच नितेश राणे यांनी विधानसभेत दाखवले आणि कारवाईची मागणी केली. यावर एसआयटी चौकशीचे आदेश गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिले.सुधाकर बडगुजर यांचा पार्टी करत असातनाचा फोटो नितेश राणेंनी सभागृहात दाखवला आहे. मविआचं सरकार आल्यानं पेग, पेंग्विन आणि पार्टीला सुरुवात झाली, असे आशिष शेलार म्हणाले.

नितेश राणे म्हणाले, दाऊदच्या जवळचा मुख्य आरोपी ९३ च्या ब्लास्टचा आरोपी हा जन्मठेप भोगतोय. पॅरोलच्या शेवटच्या दिवशी

### नितेश राणेंचा विधानसभेत गंभीर आरोप



उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नाशिक अध्यक्षासोबत पार्टी करतो. सुधाकर बडगुजर यांचा पार्टी करत असातनाचा फोटो आणि व्हिडीओ आहेत.१९९३ चा बॉम्ब ब्लास्ट हा देशाला हादरवणारा होता. यातील यारोपी सलिम कुत्ता हा पेरोलवर असताना तो पार्टी करतो. ऋउद्धव ठाकरे गटाचा नाशिकचा महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर यांच्या सोबत पार्टी करतो, ऋहे गंभीर आहे. याला कोणाचा पाठींबा आहे.

**देवेंद्र फडणवीसांकडून एसआयटीची घोषणा**

नितेश राणेंनी केलेल्या आरोपानंतर देवेंद्र फडणवीसांनी एसआयटीची घोषणा केली. देवेंद्र फडणवीस म्हणाले, सलीम कुत्ता बॉम्ब स्फोटातील मुख्य आरोपी आहेऋ. दाऊदच्या जवळचा सहकारी आहे . ऋपेरोलवरती असताना पार्टी करायची . कुत्ता याच्यासोबत कुणाचा संबंध आहे. ऋत्यात आणखी कोणाचा संबंध आहे का याची चौकशी केली जाणार आहे. एसआयटीच्या माध्यमातून वेळेत चौकशी केली जाणार आहे.

## कृष्ण जन्मभूमी खटल्यात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**दि. १५ विदर्भ प्रजासत्ताक**

मथुरेतल्या शाही ईदगाह मशिदीचं वैज्ञानिक सर्वेक्षण केलं जाणार आहे. शाही ईदगाह मशीद ही कृष्ण जन्मभूमीवर उभारण्यात आली आहे असा दावा करत हिंदू संघटनांनी केला आहे. तसेच या मशीद परिसराचं वैज्ञानिक सर्वेक्षण करण्याची मागणी करणारी याचिकाही त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायायात दाखल केली होती. गुरुवारी (१४ डिसेंबर) यावर निकाल देताना न्यायालयाने वैज्ञानिक सर्वेक्षणास परवानगी दिली. आधी मथुरा न्यायालयाने याप्रकरणी सर्वेक्षणास परवानगी होती. त्यानंतर मुस्लीम पक्षकारांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. काल उच्च न्यायालयानेही मशीद परिसराचं वैज्ञानिक सर्वेक्षण करण्याची परवानगी दिली. त्यानंतर मुस्लीम पक्षकारांनी आज सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने मशिदीच्या वैज्ञानिक सर्वेक्षणास स्थगिती दिली नाही.

## संपादकीय ......

# पूर्वी राजकीय टीकेची एक पातळी होती, पण आता.....

मराठा आरक्षणावरून मराठा आंदोलनाचे प्रमुख मनोज जरांगे-पाटील आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि ओबीसींचे नेते छगन भुजबळ यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोपांची सुरू असलेली धुमश्चक्री या दोन्ही समाजांना कुठे घेऊन जाणार आहे, याविषयी राज्यातील नागरिकांना चिंता वाटू लागली आहे. दोन्ही नेते एकमेकांवर टीका करताना जी भाषा वापरत आहेत किंवा विविध उदाहरणे देऊन विशेषणे देत आहेत, ते ऐकल्यावर लोकांचे सुरुवातीला काही काळ मनोरंजन होत असेल, पण ते एकूणच सामाजिक स्वास्थ्यासाठी हानीकारक आहे. कारण ते जबाबदार नेते आहेत. भुजबळ यांनी इंदापूर येथे केलेल्या भाषणात जरांगेंविषयी बोलताना गावातील पाण्याच्या टाकीवर चढलेल्या गाढवाचे उदाहरण दिले.

तेथील तरुणांना असा प्रश्न पडलेला असतो की, या टाकीवर चढलेल्या गाढवाला खाली कसे आणायचे, पण तिथे आलेल्या एक वृद्ध माणूस त्यांना विचारतो, 'त्याला खाली कसे उतरवायचे ते आपण नंतर बघू, पण त्याला एवढ्या उंचीवर घेऊन गेलं कोण? आता सगळे डोक्याला हात लावून बसले याला कसं खाली काढायचं? अरे याला तुम्ही वरती नेलं तेव्हा काही बोलला नाहीत, आता डोक्याला हात लावून बसले'. भुजबळ यांनी केलेल्या टीकेला जरांगे-पाटील यांनी त्यांच्या पद्धतीने उत्तर दिले. पण केवळ भुजबळ आणि जरांगे-पाटील यांच्यामुळेच नव्हे तर राज्यातील अनेक राजकीय नेत्यांकडून एकमेकांना खाली खेचण्यासाठी किंवा पोलखोल करण्याठी जी भाषा वापरली जाते, ती ऐकल्यावर आज महाराष्ट्राच्या राजकारणात गाढवांचा सुकाळ झाला आहे की काय, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. कारण जेव्हा कुणी मूर्खपणा करतो, त्यावेळी त्याला गाढवाची उपमा दिली जाते. गाढवापुढे गायली गीता कालचा गोंधळ बरा होता. गाढव गेले आणि ब्रम्हचर्यही गेले, साहेबाच्या पुढे आणि गाढवाच्या मागे कधी उभे राहू नये, अशा अनेक म्हणी आणि वाक्प्रचार गाढव या प्राण्यावरून प्रचलित झालेल्या आहेत. भुजबळ हे गेली अनेक वर्षे राजकारणात चांगले मुरलेले नेते आहेत. त्यामुळे त्यांनी जरांगे-पाटील यांच्यावर टीका करताना गाढवाची उपमा दिली असली तरी महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जो काही राजकीय फुटीरवाद आणि सावळा गोंधळ चालू आहे, त्यावरून लोकशाही शासन प्रणालीवर विश्वास ठेवून मतदान करणार्या नागरिकांना आता डोक्याला हात लावून बसायची पाळी आली आहे. या नेत्यांना आपण कशासाठी निवडून दिले आणि हे काय करत आहेत, असा पश्चाताप करावा लागत आहे.

एकामेकांना जाहीरपणे झोंबरी टीका करताना आपण किती खालची पातळी गाठत आहोत, याचे भान आजच्या राजकारणातील अनेक नेत्यांना राहिलेले नाही. मराठा समाजाला सरसकट ओबीसी म्हणून आरक्षण देण्यात यावे, यासाठी मनोज जरांगे-पाटील आंदोलन करत आहेत, त्यासाठी राज्यभर सभा घेत आहेत. त्यावेळी दुसर्या बाजूला ओबीसींच्या बाजूने छगन भुजबळ उतरले आहेत. जरांगे आणि भुजबळ हे एकमेकांना ज्या फैरी झाडत आहेत, त्या ऐकून महाराष्ट्रातील परिस्थिती पुढील काळात नेमके कोणते वळण घेणार आहे, त्याविषयी सर्वसामान्य लोकांना चिंता वाटू लागली आहे. महाराष्ट्रात मराठा आणि ओबीसी यांची संख्या मोठी आहे, त्यामुळेच त्यांचे राज्याच्या राजकारणात मोठे महत्व आहे.

संख्याबळाने मोठे असलेल्या समाजाचे नेतृत्व करणार्या नेत्यांनी संयम पाळला नाही, तर समाजातील परिस्थिती बिघडू शकते याचे भान या दोन्ही नेत्यांनी ठेवण्याची गरज आहे. प्रसारमाध्यमांसमोर आपण बोलल्यामुळे आपल्याला मोठी प्रसिद्धी मिळते, अनेक लोक आपल्याला पाहतात आणि ऐकतात, म्हणून आपण काहीही बोलावे, असे दृश्य सध्या दिसत आहे. अर्थात, ही परिस्थिती फक्त भुजबळ आणि जरांगे-पाटील यांची नाही, तर राज्यातील विविध पक्षांचे अनेक नेते एकमेकांना टीका करण्यासाठी किंवा उणीदुणी काढण्यासाठी जी भाषा वापरत आहेत, ती अशोभनीय आहे. पूर्वी राजकीय टीकेची एक पातळी होती, आता ती नाक्यावरच्या हमरातुमरीवर येऊन पोहोचली आहे.

# आ. रवि राणांची लक्षवेधी म्हणजे नौटंकी

## तुषार भारतीय यांचा आरोप

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – अमरावती शहराच्या पाणी समस्येबाबत मध्यंतरी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बैठक लावून नेरपिंगळाई ते मासोदपर्यंत सिमेंटची पाईपलाईन टाकून त्याकरिता निधीची उपलब्धता करून देण्याचे आश्वासन दिल्यानंतर या प्रक्रियेता सुरूवातही झाली आहे. मात्र, नेमकी हीच संधी हेरून आ. रवी राणा याच विषयावर हिवाळी अधिवेशना लक्षवेधी मांडण्याची नौटंकी करीत असल्याचा आरोप भाजपाचे नेते व महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती तुषार भारतीय यांनी केला आहे.

याबाबत दिलेल्या पत्रकात तुषार भारतीय यांनी म्हटले आहे की, अमरावती शहरातील पाणी समस्या अनेक दिवसापासून आहे. शहरात अजूनही नियमित पाणीपुरवठा नाही. वेळापत्रक बदलल्याने कामगारांना पाणी भरणे कठीण झाले आहे. ही परिस्थिती बघता मनपामध्ये



पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी बैठक लावून पाणी पुरवठा नियमित करण्याबाबत नेरपिंगळाई ते मासोदपर्यंत सिमेंटची पाईप लाईन टाकण्याबाबतचे अंदाज पत्रक तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यासाठी निधीची उपलब्धता करण्याचेही निर्देश देण्यात आले होते. याकरिता शासन स्तरावर प्रक्रियाही सुरू झाली असून केंद्राच्या यादीत नाव समाविष्ट झाले आहे. हे पहाताच इतके दिवस झोपी गेलेले बडनेर्याचे आमदार खडबडून जागे झाले. पाणी समस्यांचे निराकरण करण्यासाठी कधीच अमरावतीच्या अधिकार्यांच्या बैठका न घेणारे आमदार राणा हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी लावून श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे.

अमरावतीकर जनतेतच्या आता हे संपूर्ण लक्षात आले असून केवळ नाटक करून काम न करण्याच्या भूमिकेमुळे बडनेरा मतदारसंघ विकासापासून वंचित आहे. रस्ते, सांडपाणी वाहून जाणार्या नाल्या साफसफाईच्या बोंबा आहे. आमदार वखासदार एकाच घरात असूनही बडनेरा मतदार संघ विकासापासून वंचित आहे, हे दुर्दैवच म्हणावे लागेल. आमदाराने आता विकासकामात आडकाठी आणू नये. अन्यथा जनता माफ करणार नाही, आणि अश्या भूमिकेचा आपण निषेध करतो, असे तुषार भारतीय यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये स्पष्ट केले आहे.

# अमरावती ते पुणे रेल्वेगाडीच्या डब्यांमध्ये वाढ

## खा. नवनीत राणांच्या पाठपुराव्याला यश

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – अमरावती ते पुणे या नव्याने सुरू झालेल्या नियमित रेल्वेगाडीच्या डब्यांमध्ये वाढ करण्यात आली असून प्रवाशांच्या सोयीसाठी व आरामदायी प्रवासासाठी खा. नवनीत राणा यांनी रेल्वे प्रशासनाकडे यासाठी पाठपुरावा केला होता. अमरावतीवरून रोज हजारो प्रवासी पुण्याला जाणे येणे करतात. या प्रवाशांच्या सोयीसाठी खासदार नवनीत राणा यांच्या प्रयत्नाने अमरावती ते पुणे अशी नवीन नियमित चेयर कार गाडी स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यात आली होती.



या गाडीला स्लीपर कोच व एसी कोच असावा अशी नागरिकांची मागणी होती. या मागणीची दखल घेऊन खा. नवनीत राणा यांनी डब्बे वाढविण्याची विनंती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनीकुमार वैष्णव यांना केली होती. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून १५ डिसेंबरपासून ११०२६ पुणे अमरावती एक्स्प्रेस या गाडीला आता स्लीपर २ कोच, एक एसी चेयर कार व एक थ्री टायर एकोनॉमी स्लीपर असे डब्बे वाढवून मिळाले आहेत. खा. नवनीत राणा यांच्या प्रयत्नामुळे प्रवाशांना आता सुलभ, सुखकर, आरामदायी प्रवास कमी तिकीट दरात करता येणार आहे. यामुळे पुण्याला जाणारे विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक, पालक आदींनी आनंद व्यक्त करून खासदार राणा यांचे आभार मानले आहे.

### मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम-२०२४

# मतदार यादी निरीक्षकांकडून अमरावती, बडनेरा मतदारसंघातील निवडणूक कामकाजांचा आढावा

## ईव्हीएम प्रात्यक्षिक केंद्राचे विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांच्या हस्ते उद्घाटन

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – भारत निवडणूक आयोगाकडून मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२४ जाहीर करण्यात आला आहे. मतदार यादीच्या कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांची 'मतदार यादी निरीक्षक' म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. पाण्डेय यांनी आज अमरावती उपविभागीय कार्यालयात अमरावती व बडनेरा मतदारसंघातील निवडणूक कामकाजांचा आढावा घेतला. यावेळी उपविभागीय कार्यालयात उभारण्यात आलेल्या ईव्हीएम प्रात्यक्षिक केंद्राचे विभागीय आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपायुक्त संजय पवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, रणजित भोसले, भातकुलीच्या सहाय्यक जिल्हाधिकारी पी.एम. मिन्नू, तहसीलदार श्री. लोखंडे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत नागरिकांना ईव्हीएम प्रात्यक्षिक केंद्रावर मतदानाचे प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले.

डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, मतदानाविषयी मतदारांमध्ये व्यापक जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात यावे. १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व नागरिकांचे तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे नाव मतदार यादीत नोंदविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे. त्यासाठी त्यांच्याकडून आवश्यक नमूना भरुन घेण्यात यावेत. स्थलांतरीत किंवा मयत झालेल्या मतदारांसंबंधी खात्री करुन मतदार यादी अद्ययावत करण्यात यावी. घरोघरी प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित बीएलओकडून मतदारांचे सर्वेक्षण करण्यात यावे. मतदाराच्या नाव, फोटो व पत्त्यामध्ये बदल असल्यास अचूकप्रमाणे सुधारणा करुन घेण्यात यावी. तसेच मतदारांचे आक्षेप किंवा शंकांचे तात्काळ निराकरण करण्यात यावे. एकही व्यक्ती मतदानापासून वंचित राहणार नाही, याची जाणीवपूर्वक खबरदारी घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.





मतदारांच्या काही निवडणूकविषयक तक्रारी असतील त्या तत्परतेने सोडविल्या जाव्यात. मतदार निवडणूकविषयक तक्रारी असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांकावर नोंदविण्याबाबत जनजागृती करावी. शहरी आणि ग्रामीण भागात दोन्ही ठिकाणच्या मतदार यादीत मतदारांचे नाव असतात. कोणत्या एका ठिकाणी मतदार यादीत नाव पाहीजे हे मतदाराला विचारणा करून तेथील यादीत नाव ठेवावे. ज्या कुटूंबामध्ये १० व्यक्तीपेक्षा जास्त व्यक्ती आहे, अशा कुटूंबाची तपासणी करून त्यांच्यात दुरुस्ती करण्यात यावी. नवमतदार तसेच ज्यांचे नाव मतदार यादीत नाही, अशा सर्व पात्र मतदारांची मतदार यादीमध्ये नाव नोंदणीसाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी. मतदार नोंदणीसाठी व्होटर हेल्पलाईन प किंवा voters.eci.gov.in व ceo.maharashtra.gov.in चा वापर करण्यासंबंधी तसेच जवळचे मतदान केंद्रावर बीएलओकडे जाऊन नमुना ६ चा अर्ज भरण्याबाबत प्रसिध्दी पत्रकाव्दारे जनजागृती करण्याच्या सूचना डॉ. पाण्डेय यांनी यावेळी दिल्या.




# थंडीत आवडीने खाल्ले जातात 'हे' ५ स्ट्रीट फूड

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**– हिवाळ्याचा महिना सुरू झाला आहे आणि आता थोडी थोडी थंडी पडायला सुरुवात झाली आहे. हिवाळा म्हटलं की चमचमीत पदार्थ खाण्याचा आनंद द्विगुणित होतो. थंडीत गरमागरम चहासोबत खुसखुशीत स्नॅक्स खाण्यात वेगळाच आनंद असतो. फक्त चहाप्रेमीच नाही, तर अनेक खवय्ये देखील थंडीत विविध खाद्यपदार्थ खाण्याचे शौकिन असतात. या काळात अनेकजण स्ट्रीट फूडवर अधिक भर देतात.

बाहेर मिळणाऱ्या खाद्यपदार्थांची चवच इतकी भारी असते की, आपण त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. विशेष म्हणजे काही रस्त्यावरील खाद्यपदार्थांचा आस्वाद हा फक्त थंडीच्या मोसमात घेतला जातो. हिवाळ्यात काही खाद्यपदार्थ मोठ्या उत्साहाने खाल्ले जातात, या पदार्थांवर एक नजर मारुया, यातील अनेक पदार्थ हे तुमच्याही आवडीचे असतील.

**गाजरचा हलवा**– जर आपण हिवाळ्यात खाल्ल्या जाणार्या पदार्थांबद्दल बोललो तर, गाजर हलव्याला विसरुन कसं चालेल? फक्त घरातच नाही, तर भारताच्या जवळपास प्रत्येक गल्लीत किंवा कोपऱ्यात गाजरचा हलवा विकणारे दिसतात. थंडीच्या मोसमात तुम्हाला अनेक लोक गाजराचा हलवा खाण्याचा आनंद घेताना दिसतील. देशी तूप आणि गाजरापासून बनवलेल्या या गोड पदार्थाचं अनेकांना वेड आहे.

**पाया सूप** – हिवाळ्यातील ही एक लोकप्रिय डिश आहे, जी शरीराला आतून उबदार ठेवण्यास मदत करते. मुंबईत मटणाचं पाया सूप सर्वाधिक प्रमाणात प्यायलं जातं, तर दिल्लीचे लोक पारंपारिक पद्धतीने शेळी, मेंढ्या किंवा इतर प्राण्यांच्या पायापासून सूप बनवतात आणि ते मोठ्या आवडीने पितात. हे आरोग्यासाठीही उत्तम आहे आणि त्याची चवही अप्रतिम आहे.

**पाणीपुरी** – थंडीच्या मोसमात गरमागरम पाणीपुरी खाण्याची मज्जाच काही वेगळी असते. पाणीपुरी तोंडात टाकल्यावर फुटते आणि तिचा जो स्वाद असतो, तो शब्दातही सांगता येणार



नाही. संपूर्ण भारतात विविध नावाने हा पदार्थ प्रचलित आहे आणि सर्वांच्या आवडीचा आहे.

**छोले भटुरे** – थंडीच्या दिवसांत अनेकजण छोले भटुरे खाण्याला पसंती दर्शवतात. अगदी मुंबईपासून दिल्लीपर्यंत सर्वजण हा पदार्थ आवडीने चाखतात. दिल्ली आणि छोले भटुरे यांच्यात तर एक अतुट नातं आहे. दरवर्षी राजधानीत कडाक्याची थंडी पडली की, शेकडो लोक स्वतःला उबदार ठेवण्यासाठी त्यांच्या आवडत्या मसालेदार छोले आणि तळलेल्या पुरीचा मनसोक्त आनंद घेतात.

**मसाला दूध**– थंडीत भुरके मारत गरमागरम मसाला दूध पिण्याची मजाच काही और आहे. दुधासोबत पोटात जाणारा सुकामेवा आणि अलगद पसरलेला केशराचा सुवास म्हणजे वाह... थंडीची मजा वाढवण्यासाठी अनेकजण मसाला दूध पिण्याला पसंती दर्शवतात. थंडी वाढू लागली की मसाला दूध पिण्याची मजा काही वेगळीच आहे. औरंगाबाद, पुणे आणि इतरही काही शहरांमध्ये थंडीच्या दिवसांत अगदी चौकाचौकात गरमागरम मसाला दूध बनवणारे ठेले दिसू लागतात.



# हर्मन फिनोकेम कंपनी उद्योग उभारणार

## उच्चस्तरीय अधिकाऱ्याची बैठक, कंपनीच्या तांत्रिक अडचणी दूर


**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ** नांदगाव पेठ पंचतारांकित औद्योगिक वसाहत येथे मे. हर्मन फिनोकेम कंपनीचे औषधी निर्मिती प्रकल्प प्रस्तावित होता. तांत्रिक कारणास्तव कंपनीने माघार घेतल्याचे समोर आले होते. याची प्रशासनाने दखल घेऊन कंपनीच्या प्रतिनिधींसोबत आज तातडीने बैठक घेतली. कंपनीने येथेच उद्योग सुरू करण्यासाठी सकारात्मकता दर्शविली आहे. बैठकीत कंपनीच्या प्रतिनिधींशी विस्तृत चर्चा करुन त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. प्रकल्प सुरु करण्यासंदर्भात येणार्या अडचणी तातडीने मार्गी लावून भविष्यात कोणत्याही अडचणी येणार नसल्याचे ग्वाही जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी यावेळी दिली. या बैठकीत महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी यांनीही कंपनीच्या तांत्रिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला पोलिस अधीक्षक विशाल सिंगुरी, औद्योगिक विकास महामंडाळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपिन शर्मा, सहमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.विजय राठोड, हरमन फिनोकेम लि. कंपनीचे महाव्यवस्थापक चंद्रकांत नारकर तसेच जिल्हा प्रशासनाचे अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

मे. हर्मन फिनोकेम कंपनीला औषध निर्मितीसाठी नांदगाव पेठ पंचतारांकित औद्योगिक वसाहत येथे ११८ एकर जागा महामंडळ मार्फत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कंपनीला येणार्या तांत्रिक अडचणी सोडविण्याच्या हमीनंतर कंपनीचे प्रतिनिधी महाव्यवस्थापक चंद्रकांत नारकर यांनी प्रशासनाचे आभार व्यक्त करुन उद्योग सुरु करण्याबाबत सकारात्मकता दर्शविली. बैठकीनंतर नांदगाव पेठ औद्योगिक वसाहत येथे हरमन फिनोकेम लि. कंपनीला दिलेल्या जागेची जिल्हाधिकारी कटियार यांच्यासह संबंधित सर्व अधिकार्यांनी पाहणी केली.

# मेळघाट मध्ये सामान्य बाज या दुर्मिळ पक्ष्याची प्रथमच नोंद

## मेळघाटच्या यादीत आणखी एका प्रजातीची भर

**दि१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** मेळघाटचे जंगल हे विविधतेने संपन्न असा अधिवास असून या ठिकाणी पक्षी प्रजातींची विविधता विशेष संपन्न आहे. देशभरात आढळणाऱ्या एकूण प्रजातींपैकी आजवर जवळपास २५ टक्के प्रजातींची या ठिकाणी नोंद झालेली आहे. मेळघाटच्या जंगलात पक्षी अभ्यासाची सुरुवात सुमारे दीडशे वर्षापूर्वी झाली होती त्यानंतर वेगवेगळ्या काळात झालेल्या अभ्यासातून आजवर ३०४ पक्ष्यांची नोंद झालेली आहे. या यादीत सामान्य बाज या पक्ष्याची नव्याने भर पडली असून ही प्रजाती नुकतीच मेळघाट व्याघ्र प्रकल्पात आढळून आली आहे.मेळघाट येथे नुकतेच बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे चार दिवसीय निसर्गशिबीर संपन्न झाले. या दरम्यान शिबिरातील सहभागी व तज्ञ मार्गदर्शक हे अकोट वन्यजीव विभागातील जंगल भ्रमंतीमध्ये असतांना धारगड भागातील जंगलात सामान्य बाज हा दुर्मिळ पक्षी आढळून आला. पक्षी अभ्यासक तथा मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर, निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. निशिकांत काळे, बीएनएचएसचे अभ्यासक श्री. नंदकिशोर दुधे, पक्षिमित्रचे श्री अमोल सावंत व शिबिरार्थींना हा पक्षी एका वाळलेल्या झाडाच्या खोडावर बसलेला आढळून आला. त्याचे निरीक्षण केले असता तो शुभ्रनयन तिसा या प्रजाती पेक्षा वेगळा वाटल्याने त्याचे थांबून सखोल निरीक्षण केले आणि त्याची चांगली छायाचित्रे टिपण्यात आलीत. शेवटी हा पक्षी सामान्य बाज नावाचा दुर्मिळ पक्षी असल्याची खात्री पटली. ही या पक्ष्याची मेळघाटातील प्रथम नोंद आहे. यापूर्वी मेळघाटच्या पक्षी सुचिमध्ये या पक्ष्याचा समावेश नव्हता. सामान्य बाझ हा पक्षी भारतात हिवाळी स्थलांतर करून येणारी एक दुर्मिळ प्रजाती असून याच्या तुरळक नोंदी यापूर्वी मध्य भारतात व महाराष्ट्रात झालेल्या आहेत. हा पक्षी उत्तर पाकिस्तान व काश्मीर या प्रदेशातील रहिवाशी असून तो हिवाळ्यात दक्षिणेकडे, विशेषतः श्रीलंका व केरळ राज्यात स्थलांतर करून जातो. बाझ कुळातील सामान्य बाझ या पक्ष्याची इंग्रजी ओळख कॉमन बझार्डकिंवा स्टेपी बझार्ड अशी असून शास्त्रीय नाव बुटीओ बुटीओ असे आहे. मेळघाटात आढळून आलेला हा पक्षी बुटीओ बुटीओ प्रजातीची वूल्पीनस ही उप प्रजाती असून यामध्ये दोन उप प्रजाती आढळतात. आकाराने शुभ्रनयन तिसा या प्रजाती पेक्षा मोठा जवळपास ५५ सेंमी असलेला हा बाझ रंगाने गडद विटकरी असून छातीवर व डोक्यावर तपकिरी रंगाच्या उभ्या रेषा असतात. चोच आखूड व टोकावर काळ्या रंगाची असून डोळ्यावर काळ्या रंगाची भुवई दिसते. शेपूट आखूड व त्यावर



खालून बारीक उभ्या रेषा असतात. शिकारी पक्षी गटातील या पक्ष्याचे खाद्य इतर गरुड किंवा बाझ प्रमाणे लहान प्राणी, सरडे साप इत्यादी असून तो मासाहारी पक्षी आहे. सामान्य बाझ प्रजातीच्या या नोंदीमुळे मेळघाटातील पक्ष्यांची यादी ३०५ इतकी झाली आहे. या महिन्याच्या अखेरीस मेळघाटात पक्ष्यांच्या अभ्यासासाठी मेळघाट सर्वेक्षण कार्यक्रम सुद्धा होणार असून या मधून सुद्धा मेळघाटातील पक्ष्यांच्या स्थितीवर प्रकाश टाकला जाणार आहे.

> मेळघाटचे जंगल हा सातपुड्यातील सर्वात जैवविविधता संपन्न प्रदेश असून सुरक्षित असा अधिवास आहे. स्थलांतर करून दक्षिणेकडे जाणाऱ्या पक्ष्यांसाठी सातपुडा हा महत्वाचा संचार मार्ग असून या मार्गाने अनेक पक्षी स्थलांतर करीत असतात व या भागात सुद्धा स्थलांतर करून येत असतात. सामान्य बाझ या पक्ष्याची नोंद कदाचित त्याच्या प्रवासादरम्यान झाली असावी. हा पक्षी या ठिकाणी संपूर्ण हिवाळाभर दिसला तर या ठिकाणी तो स्थलांतर करून येत असावा असे समजता येईल. या नोंदीमुळे सातपुडा हा स्थलांतरासाठी महत्वाचा संचार मार्ग असल्याचे महत्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. मेळघाटात अशा अनेक पक्ष्यांच्या नोंदी होण्यास वाव आहे.
> **– डॉ. जयंत वडतकर, मानद वन्यजीव रक्षक**

# तिवस्यात प्रकल्प कार्यालयावर अंगणवाडीसेविकांचे धरणे आंदोलन

> दि ४डिसेंबर पासून सर्व अंगणवाडी, बालवाडी सेविका, मदतनिस या बेमुदत संपावर गेल्या असून निवेदन,धरणे आंदोलनाच्या माध्यमातून आपल्याला महत्वपूर्ण मागण्याकडे सरकारचे लक्ष वेधून पाहत आहे.अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय तसेच तालुका स्तरावर देखील आंदोलन करण्यात आले परंतु अजूनपर्यंत मागण्यासंधर्भात राज्य शासनाकडून कुठलीही भूमिका घेण्यात आली नसल्यामुळे आज हजारो अंगणवाडी, सेविका, मदतनिस या नागपूरच्या अधिवेशनावर धडकणार आहे.

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक तिवसा** आपल्या विविध मागण्यासाठी तिवसा प्रकल्प अधिकारी कार्यालयावर महाराष्ट्र राज्य अंगणवाडी, बालवाडी कर्मचारी युनियन आयटकच्या वतीने आज दुपारी २वाजता तालुक्यातील शेकडो अंगणवाडी सेविका व मदतनिस यांनी धरणे आंदोलन केले यावेळी सरकार विरोधात तीव्र नारेबाजी करत निषेध करण्यात



आला.

गेल्या अनेक महिण्यापासून राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनिस या ग्रॅज्युटीबाबत न्यायालयाने दिलेल्या निकालाची अंमलबजावणी करावी,सर्व अंगणवाडी सेविका,मदतनीस ही पदे वैधानिक पदे कर्मचारी म्हणून घोषित करून त्यांना वेतनश्रेनी भविष्य निर्वाह निधी, सुरक्षा यासह शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणारे विविध लाभ देण्यात यावे. अंगणवाडी सेविकेला सविस हजार व मदतनिस यांना वीस हजार रुपयापर्यंत मानधानात वाढ करावी, महागाई भत्ता, पेन्शन अश्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले या सर्व मागण्याचे निवेदन यावेळी प्रकल्प अधिकारी तिवसा यांना देण्यात आले.यावेळी तालुका अध्यक्ष सौ. उषाताई गेडाम ,सचिव वंदनाताई बुटले,ममता कठाणे,योगिता वानखडे, संगीता मानमोडे, रजनी बेलसरे,वेनू राऊत,लता पारवे,वनमाला राऊत,हेमलता कुलकर्णी,पंचफुला चव्हाण,उषा पांडे,शालिनी खाकसे, अर्चना भुरे, प्रतिभा डिवरे यासह शेकडो अंगणवाडी सेविका मदतनीस या धरणे आंदोलनात सहभागी झाल्या होत्या

# एक दिवसीय उद्योजकीय क्षमता विकास कार्यशाळेचे आयोजन

## आत्मनिर्भर युवा उद्योजक घडविण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांना मिळणार अर्थसहाय्य

## श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची विद्यार्थी विकासप्रवण अभिनव योजना

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, शिक्षण महर्षी, कृषिरत्न डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती म्हणून २०२३-२४ हे वर्ष विविध उपक्रम राबवून साजरे करण्यात येत आहे. हे औचित्य साधून गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनातून सकारात्मक, कर्तव्यदक्ष व प्रामाणिक युवा पिढी घडविण्याच्या दृष्टीने आणि प्रामुख्याने शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारक बदलांची नांदी ठरत असलेल्या नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात उद्योजकतेची कास धरलेल्या कौशल्य विकासाला अनन्यसाधारण महत्व देवून स्वतंत्र स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्ष; विद्यार्थी विकास कक्ष तसेच करिअर कट्टा महाविद्यालयात कार्यरत आहेत.

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती मध्ये हे सर्व कक्ष महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवीत असतात. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची उद्योजकता कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने दिनांक १६ डिसेम्बर २०२३ रोजी उद्योगाच्या नाविन्यपूर्ण संकल्पना स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.




या स्पर्धेत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी नाविन्यपूर्ण, व्यवहार्य आणि नफा कमावणारी व्यावसायिक कल्पना शोधतील, ही कल्पना व्यावसायिक स्वरुपात पुढे आणण्यासाठी समविचारी विद्यार्थ्यांची चमू तयार करतील; हि चमू प्रस्तावित व्यवसायाचे मिशन, समस्या, समाधान, उत्पादन/सेवा, बाजार विश्लेषण, निधी प्रवाह, संघ, इत्यादींचा समावेश असलेले पिच डेक (पीपीटी) तयार करून स्पर्धेत आपली कल्पना सादर करून आवश्यक सहकार्य निधी, सुविधा, ई. ची मागणी महाविद्यालयाला करेल. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना त्यांचा स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी निधी तसेच इतर सहकार्य पुरविणार आहे. विजेत्या चमुना दिनांक १९ डिसेम्बर रोजी महाविद्यालयाच्या स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्षाच्या माध्यमातून रु.१ लक्ष आणि करिअर कट्टाच्या सेंटर ऑफ एक्सलंस च्या माध्यमातून निधी रु.१ लक्ष प्रदान करण्यात येणार आहे.या निमित्ताने १९ डिसेम्बर, २०२३ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांचा स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष मा. किरण पातुरकर विद्यार्थ्यांना उद्योजकीय क्षमता विकास या संबधी तर इनक्यूबेशन सेंटर, विषयी अमरावती केंद्राचे सीईओ श्री अमित हिरुळकर मार्गदर्शन करतील. जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजनांची माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक मा. श्री निलेश निकम यानिमित्ताने देणार आहेत.या क्षेत्रातील तज्ञ आणि यशस्वी व्यक्ती म्हणून मा. श्री. प्रदीप इंगळे, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, अमरावती विद्यार्थ्यांना यशस्वी उद्योजक व्यक्तिमत्वाचे पैलू या विषयावर मार्गदर्शन करतील तर मा. श्री. अमित आरोकार, संचालक, ईसीइ एनेर्जीज प्रा. लि., अमरावती हे संकल्पना ते उद्योजकता विषयावर विद्यार्थ्यांना एखाद्या व्यवसाय निर्मितीची संकल्पना उदयास येवून त्यामाध्यमातून प्रत्यक्ष उद्योग साकारण्यासाठी विद्यार्थ्यांना कसे मार्गक्रमण करायला हवे? या मुद्यावर भर देणार आहेत.याच कार्यशाळेत महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या सहयोगाने आयोजित केलेल्या महाराष्ट्र स्टुडन्ट इनोवेशन चॅलेंज या स्पर्धेत उत्कृष्ट ठरलेल्या निवडक विद्यार्थ्यांचे संकल्पनांचे सादरीकरण होणार आहे. अमरावती जिल्ह्याचे सन्माननीय जिल्हाधिकारी श्री सौरभ कटियार यांच्या उपस्थितीत श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष मा. दिलीपबाबू इंगोले यांच्या अध्यक्षतेत या स्पर्धेचे बक्षिस वितरण पार पडणार आहे.

बॉक्स:

> महाविद्यालयाच्या स्टार्ट-अप व उद्योजकता विकास कक्ष समन्वयक प्रा. डॉ. दिनेश खेडकर यांनी या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण उद्योगांच्या संकल्पनांना साकारण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव महाविद्यालय विकास समितीसमोर सादर केला होता. संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष मा. हर्षवर्धन देशमुख आणि विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय क्षमता विकास व्हावा या उदात्त हेतूने रु.१ लक्ष रुपयांचे प्रावधान केले. सोबतच करिअर कट्टाच्या सेंटर ऑफ एक्सलंसचा देखील रु.१ लक्ष रुपये निधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येणार आहे
> **– डॉ जी व्ही कोरपे, प्राचार्य,** श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.

# प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांना वीजबिलात माफी द्यावी

## काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांची मागणी

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** –ग्रामीण भागात नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या बहुतांश प्रादेशिक पाणीपुरवठा योजना थकीत वीजबिल आकारणी अभावी बंद झालेल्या आहेत, या योजनांना शासनाने वीजबिलात माफी किंवा सवलत द्यावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी सभागृहात केली. नागपूर हिवाळी अधिवेशनात बाळासाहेब थोरात यांनी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचा मुद्दा लावून धरला. थोरात म्हणाले, 'राज्यात बहुतांश भागात दुष्काळाची परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्याची परिस्थिती गंभीर झाली आहे. अशावेळी थेट पाण्याचा उद्भव नसलेल्या भागात



शासनाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चांगले काम करतात. मात्र या योजना राबवताना मोठे वीजबिल त्यासाठी आकारले जाते. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर हे वीजबिल भरणे लाभार्थ्यांना परवडत नाही. आज महाराष्ट्रातल्या सर्वच जिल्ह्यांत ग्रामीण भागात प्रादेशिक पाणीपुरवठा योजनाची अवस्था वीज देयकच्या बाबतीत अत्यंत कठीण झालेली आहे. त्यांची विज कट केली जात आहे, अशा परिस्थितीत या गावांमध्ये आठ-आठ दिवस पाणीपुरवठाच होत नाही. यामध्ये शासनाने गंभीरपणे विचार करावा व त्याबाबत धोरण निश्चित करून त्या गावच्या पाठिशी उभे राहावे.'

थोरात पुढे म्हणाले, 'महाराष्ट्राच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. योजना सुरू झालेल्या आहे. आता विजबिला अभावी योजना ठप्प आहेत, नागरिकांना पाणी मिळत नाही, शासनाला जबाबदारी घ्यावी लागेल. या अगोदरही शासनाने निर्णय घेतलेला आहे. आता उशीर करू नये. धोरण ठरवावे आणि सामान्य माणसाला दिलासा द्यावा.'

## मच्छिमारांना विविध योजनेचा लाभ देण्यासाठी विशेष मोहिम

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** जिल्ह्यातील मच्छिमारांसाठी शासनाव्दारे विविध योजना राबविण्यात येतात. या योजनेचा लाभ देण्यासाठी सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय विभागामार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा मच्छिमारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मत्स्यव्यवसायचे सहायक आयुक्त सु. रा. भारती यांनी केले आहे.किसान क्रेडीट कार्ड या योजनेंतर्गत मत्स्यकास्तकारांना मत्स्यव्यवसाय उपयोगी साहित्य जसे मत्सबीज, मत्स्यखाद्य, जाळे, होडी, खते इ. खरेदीसाठी बँकेमार्फत विनातारण खेळते भांडवल आर्थिक स्वरुपात व अत्यल्प व्याज दराने उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच अपघात गट विमा योजनामधून मच्छिमारांचा विनामुल्य विमा काढण्यात येतो. योजनेमध्ये मच्छिमाराचा अपघाती मृत्यू किंवा कायमस्वरुपी संपूर्ण अपंगत्व झाल्यास त्याच्या वारसदारास ५ लक्ष रुपये, कायमचे अपंगत्व आल्यास २ लक्ष ५० हजार रुपये तसेच अपघाती रुग्णालयात दाखल केल्यास २५ हजार रुपये आर्थिक मदत देण्यात येते. ई-श्रम कार्ड या योजनेंतर्गत असंघटित क्षेत्रातील सर्व नोंदणीकृत मच्छिमार किवा मत्स्यकास्तकारांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेव्दारे अपघात विमा संरक्षण दिले जाते. ई-श्रम कार्ड योजनेत अपघाती मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व आल्यास २ लक्ष रुपये, आंशिक प्रमाणात अपंगत्व आल्यास १ लक्ष रुपयांचा लाभ दिला जातो.

# शासकीय योजनांची माहिती घेऊन विकसित भारत संकल्प यात्रा आली दारी



**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** भारत सरकारच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ वंचित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'विकसित भारत संकल्प यात्रा' ही मोहीम १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आली आहे. मोहिमेअंतर्गत केंद्र शासनाच्या योजनांची माहिती देणारा चित्ररथ शहरी भागात फिरविला जात असून त्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा यशस्वी प्रयत्न होत आहे.

अमरावती महानगरपालिकेतर्फे विकसित भारत संकल्प यात्रा गुरुवार दिनांक १४/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते १२.३० वाजेपर्यंत राममोहन गार्डन, किशोर कॉलनी व दुपारी ३.०० ते ५.३० वाजेपर्यंत व-हाडे हॉस्पीटल गाडगे नगर येथे आयोजित करण्यात आले होते.

सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांच्या उपस्थितीत या विकसित संकल्प यात्रेचा शुभारंभ सकाळी १०.०० वाजता राममोहन गार्डन, किशोर कॉलनी व दुपारी ३.०० वाजता व-हाडे हॉस्पीटल गाडगे नगर येथे करण्यात आला.

केंद्र सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ वंचित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा म्हणून विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहचविण्याची संधी या यात्रेच्या माध्यमातून उपलब्ध झालेली आहे. शहरासाठी विकसित भारत संकल्प यात्रेसाठी एलईडी व्हॅन प्राप्त झाला आहेत. या व्हॅनच्या माध्यमातून शहरातील दररोज दोन ठिकाणी शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांचा जागर करण्यात येत आहे. याबाबतचे परिपूर्ण नियोजन अमरावती महानगरपालिका करीत आहेत.

शहरी भागात पीएम स्वनिधी, पीएम विश्वकर्मा, पीएम उज्वला योजना, पीएम मुद्रा योजना, स्टाटअप इंडिया, आयुष्यमान भारत, पीएम आवास योजना, स्वच्छ भारत अभियान, पीएम ई-बस सेवा, सौभाग्य योजना, उजाला योजना, पीएम भारत जन औषध परियोजना, डिजिटल पेमेंट, खेलो इंडिया, वंदे भारत ट्रेन आणि अमृत भारत स्टेशन योजना आदी विविध योजनांच्या जनजागृतीवर भर देण्यात येत आहे.

# समृद्धी महामार्गावर वर्षभरात ४२१ कोटी रु.चा टोल वसूल

## वर्षभरात धावली ६० लाख वाहने

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** – महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने बांधलेला समृद्धी महामार्ग 'गेमचेंजर' ठरत आहे. या महामार्गावर वर्षभरात ६० लाख वाहनांनी ये–जा केली. ४२१ कोटी रुपयांचा टोल भरला गेला. लोकांनी फार मोठ्या प्रमाणात या 'समृद्धी'ला पसंती दिल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ डिसेंबर २०२२ रोजी समृद्धीच्या टप्पा एकचे उद्घाटन झाले होते. समृद्धीच्या रचनेत दोष असल्याने अपघात होतात, हा तर्क निराधार असल्याचे अपघातांची कारणे बघितली असता स्पष्ट होते.

'एमएसआरडीस'ने 'सेव्ह लाइफ इंडिया'कडून प्रत्येक दुर्घटनेचे विश्लेषण करून डेटा तयार केला आहे. ६० लाख वाहनांनी ये–जा केली व त्यातील केवळ ७५ वाहनांचे अपघात हे जीवघेणे ठरले. अपघातावरील उपाययोजनांचे परिणाम दिसत आहेत, अशी माहिती 'एमएसआरडीसी'चे सहव्यवस्थापकीय संचालक संजय यादव यांनी दिली.

विधिमंडळ अधिवेशनासाठी अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी हे समृद्धी महामार्गानेच नागपूरला पोहोचले. सर्वपक्षीय आमदारांनी या मार्गाचे कौतुकच केले. हा ड्रीम प्रोजेक्ट म्हणजे राज्याची भाग्यरेषा आहे. त्याचवेळी या महामार्गावर मध्येमध्ये फूड कोर्ट असावेत, पुरेशा स्वच्छतागृहांची व्यवस्था असावी, असा प्रातिनिधिक सूर आहे.

### ही आहेत दुर्घटनांची कारणे

घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन चालविणे, दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर न ठेवणे, चुकीच्या पद्धतीने केलेले ओव्हरटेक, लेनची शिस्त न पाळणे, वाहन सुस्थितीत नसणे, वाहन अवैधरीत्या पार्क करणे, वाहतूक सुरक्षेविषयी न घेतलेली काळजी, चालक सतर्क नसणे, वाहनांतील बिघाड, आग लागणे, वाहनांचा तोल जाऊन ते उलटणे, प्राणी अचानक वाहनासमोर येणे ही अपघातांची विविध कारणे होती.



# विदर्भात अधिवेशन कशासाठी घेता?

## विधानसभेच्या पत्रकार गॅलरीत प्रकाश पोहरे यांची घोषणाबाजी, सुरक्षा रक्षकांनी घेतले ताब्यात

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** – संसदेत बुधवारी घडलेल्या घटनेतंर ज्येष्ठ पत्रकार व विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष प्रकाश पोहरे यांनी गुरुवारी रात्री ७.४० च्या सुमारास विधानसभेच्या पत्रकार गॅलरीत येऊन विदर्भाच्या मुद्यावर आमदारांना उद्देशून घोषणाबाजी केली. याकडे लक्ष वेधून भाजपचे आ. अँड आशिष शेलार यांनी ही कसली सुरक्षा, असा सवाल केला. याची गंभीर दखल घेत तालिका अध्यक्ष चेतन तुपे यांनी या प्ररणाची चौकशी करून कारवाईचे आदेश दिले. घोषणाबाजीनंतर लगेच पोहरे सभागृहाबाहेर पडले. तेथे विधिमंडळ सुरक्षा रक्षकांनी त्यांना ताब्यात घेतले.

बुधवारी संसदेच्या प्रेक्षक गॅलरीतून दोन युवकांनी सभागृहात उडी घेतल्याचा प्रकार घडला होता. या पार्श्वभूमीवर नागपुरात सुरु असलेल्या विधिमंडळ अधिवेशनातही कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. प्रेक्षक गॅलरीत बसणाऱ्या प्रत्येकाची योग्य तपासणी करूनच प्रवेश दिला गेला. दिवसभराच्या कामकाजानंतर रात्री मराठा आरक्षणावर चर्चा सुरू असताना ७.४० सुमारास पत्रकार प्रकाश पोहरे पत्रकार गॅलरीत येऊन बसले. काही वेळातच ते उभे राहिले व सभागृहात बसलेल्या आमदारांना उद्देशून विदर्भात अधिवेशन होत असल्याचे सांगत विदर्भाच्या प्रश्नांवर बोलणार की नाही, असे मोठमठ्याने विचारू लागले. विदर्भात अधिवेशन कशासाठी घेता, असेही ते आमदारांना ओरडून म्हणाले. यामुळे सभागृहाच्या कामकाजात अडथळा निर्माण झाला. आमदारांनी यावर आक्षेप घेतला.



भाजपचे मुख्य प्रतोद आ. ड. आशिष शेलार यांनी ही कसली सुरक्षा, असा सवाल केला. काल संसदेत घडलेल्या घटनेनंतरही विधानसभेच्या पत्रकार गॅलरीत कोणीतरी येतो, अध्यक्षांकडे हातवारे करून घोषणाबाजी करतो, कोण आहे ही व्यक्ती, त्यांना प्रवेश कसा मिळाला, विधानसभेची सुरक्षा कशी काय भेदली, असे प्रश्न उपस्थितीत करुन या प्रकरणी चौकशी करण्याची मागणी केली. तालिका अध्यक्ष चेतन तुपे यांनी ती मान्य करीत चौकशीचे आदेश दिले. घोषणाबाजीनंतर पोहरे सभागृहारे पडले असताना सुरक्षारक्षकांनी त्यांना ताब्यात घेतले.

# 'तो' बिबट्या जेरबंद करण्याचे आदेश

## आ. खोडकेंच्या प्रश्नाला वनमंत्र्यांचे उत्तर

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – शहरातल्या व्हीएमव्ही कॉलेज परिसरात मागील दोन महिन्यापासून बिबट्याचा संचार असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये दहशत व भीती निर्माण झाली आहे. या बिबट्याला तत्काळ जेरबंद करण्याचा मुद्दा आ. सुलभा खोडके यांनी हिवाळी अधिवेशनात उपस्थित केला होता. सदर बिबट्याला तात्काळ जेरबंद करण्याचे आदशे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वनविभागाला दिले आहे.बिबट्या संदर्भात आ. खोडके यांनी ८ ऑक्टोबर रोजी वन कर्मचार्यांना बिबट्याला जेरबंद करण्याची सूचना केली होती. यावेळी बिबट्याचा शोध न लागण्याने नंतर दहा दिवसांनी पुन्हा मणिपूर लेआऊट भागात बिबट्याने उपद्रव घातला. त्यावेळी खा. खोडके यांनी डीएफओ मिश्रा यांच्याशी संपर्क साधून बिबट्याला तत्काळ जेरबंद करण्यासाठी रेस्क्यू पथक तैनात करून प्रभावी व सुरक्षात्मक उपाययोजना करण्याबाबत सूचना केली . मात्र दोन महिन्यापासून बिबट्या पकडण्यात आला नाही. स्थानिक विद्यार्थी, नागरिक व महिलांना घराबाहेर पडणे धोक्याचे झाले आहे. वनमंत्री मुनगंटीवार यांना आ. खोडके यांनी पत्र बिबट्याला तत्काळ जेरबंद करण्यासाठी वन विभागाला आदेश देण्याचे मागणी केली होती. ती मान्य करण्यात आली आहे.



# राज्यातील भाजप आमदारांना मंगळवारी संघाचे 'बौद्धिक'; महायुतीचे इतर आमदार जाणार का?

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** – मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थानमधील विजयानंतर भाजप आमदारांमध्ये उत्साह असून आता देशपातळीवर राममंदिराच्या प्राणप्रतिष्ठेसाठी वातावरणनिर्मिती करण्यावर भर देण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने उपराजधानीत आलेल्या भाजपच्या मंत्री–आमदारांना संघातर्फे विशेष 'बौद्धिक' देण्यात येणार आहे. १९ डिसेंबर रोजी या वर्गाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

२०१४ मधील सत्ताबदलानंतर संघातर्फे अधिवेशनासाठी येणाऱ्या आमदार व मंत्र्यांसाठी उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे. यावेळी त्यांना संघाच्या पदाधिकाऱ्यांकडून संघ विचारधारा आणि सामाजिक क्षेत्रात कार्याबाबत माहिती देण्यावर भर असतो. यंदादेखील हिवाळी अधिवेशनानिमित्त राज्यभरातील आमदार नागपूरात आले आहेत. हा मुहूर्त साधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडूनभाजपाच्या सर्व मंत्री व आमदारासाठी या वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. १९ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता रेशीमबाग येथील स्मृतिमंदिर परिसरात हा उद्बोधन वर्ग होईल. या वर्गाला



उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत भाजपचे सर्व मंत्री व आमदार उपस्थित राहतील अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

यावेळी आमदार व मंत्री रेशीमबाग येथील स्मृतिमंदिर परिसरात जाऊन आद्य सरसंघचालक डॉ.केशव बळीराम हेडगेवार व द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांच्या समाधीचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर महर्षी व्यास सभागृहात सर्वांना संघ पदाधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. यंदा संघाकडून नेमके कोण पदाधिकारी मार्गदर्शन करणार याबाबत गोपनीयता बाळगण्यात आली आहे. भाजपच्या एका वरिष्ठ आमदाराने नाव न छापण्याच्या अटीवर मंगळवारीच रेशीमबागेत भेट असल्याची माहिती दिली. दरम्यान, महायुतीतील शिवसेना व राष्ट्रवादीचे सदस्यदेखील रेशीमबागेत जाणार का याबाबत विविध कयास वर्तविण्यात येत आहेत.

### जनतेमध्ये जाण्याच्या सूचना

२०२४ च्या निवडणूकांना फार कालावधी राहिलेला नाही. अशा स्थितीत जनप्रतिनिधींनी जनतेमध्ये जाऊन खऱ्या अर्थाने काम केले पाहिजे, असे संघाकडून वारंवार सांगण्यात आले आहे. यासंदर्भातच संघाकडून आमदारांशी संवाद साधण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. सोबतच भाजपाच्या एखाद्या मंत्र्याने कुठलीही गैरवर्तणूक केली तर 'स्वयंसेवक' बिघडला, अशी टीका होते. जनतेच्या सरकारकडून अपेक्षा वाढल्या आहेत. अशा स्थितीत आमदार व मंत्र्यांचे नेमके आचरण कसे हवे आणि जनताहितासाठी कुठल्या बाबींमध्ये पुढाकार घ्यायला हवा, यावर उद्बोधन वर्गाचा भर राहणार आहे.

# लोकसभा निवडणुकांसाठी भाजपचा मेगाप्लॅन

## ५५ दिवसांत आचारसंहिता लागणार, आमदारांना कामाला लागण्याच्या सूचना

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** – लोकसभा निवडणुकांसाठी भाजपने मेगाप्लान तयार केला असल्याची माहिती समोर आलीये. भाजपचा हाच मेगाप्लान एबीपी माझाच्या हाती लागलाय. ५५ दिवसांता आचारसंहिता लागणार असून सर्व आमदारांना कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या देवगिरी बंगल्यावर भाजपच्या सर्व आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सर्व आमदारांना कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लोकसभा निवडणुकांच्या आचारसंहितेला फार दिवस राहिले नसून ५५ दिवसांत आचारसंहिता लागेल, त्यामुळे कामाला लागा अशा सूचना या बैठकीत देण्यात आल्या आहेत.



त्याच पार्श्वभूमीवर भाजपकडून सर्व आमदारांना नमो टार्गेट देण्यात आलं आहे. आज देवगिरीवर झालेल्या बैठकीत तसेच यापूर्वी मुंबईत झालेल्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या बैठकीत अनुपस्थित आमदारांच्या संख्येबाबत कानउघडणी देखील करण्यात आलीये.

### भाजपचा मेगाप्लान नेमका काय?

२५ जानेवारीपर्यंत राज्यात ५० लाख नमो ॲप डाऊनलोड करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक आमदारांनं मतदारसंघात किमान ३० हजार ॲप डाऊनलोड करुन घ्यावेत. आमदारांनी रोज सकाळी किमान ५ मिनिटं नमो ॲपवर घालवावीत. मतदारसंघात १५० बूथ प्रमुख तयार करावेत, बूथप्रमाणे सुपर वॉरियर देखील नेमावेत. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेला आता जास्त दिवस नाहीत. फेब्रुवारी महिन्यात देवेंद्र फडणवीसांची लोकसभा निवडणुकांसाठीची विशेष यात्रा देखील निघणार आहे. ही यात्रा प्रत्येक लोकसभा मतदारसंघातून जाईल, असा मेगाप्लान भाजपकडून तयार करण्यात आलाय.

# कर्मचार्यांच्या संपाने कामाचा खोळंबा, ठिकठिकाणी निदर्शने, बेमुदत आंदोलन

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मुख्य मागणीसह अन्य काही मागण्यांसाठी जिल्हा परिषदेचे कर्मचारी वगळता जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय विभागाचे कर्मचारी गुरूवार १४ डिसेंबरपासून संपावर गेले. त्यामुळे सर्व कार्यालयांमध्ये कामाचा खोळंबा झाला आहे. संप कायम राहील्यास सामान्यांच्या अडचणी वाढणार आहे. निवृत्तीचे वय ६० करावे आणि कंत्राटी कर्मचार्यांना सेवेत कायम करावे, या दोन मागण्याही कर्मचार्यांनी जोरदारपणे रेटल्या आहे. सोबतीला अन्य मागण्यापण आहे. मागण्यांच्या संदर्भात गुरवारी अमरावती शहरात जिल्हाधिकारी कार्यालय, सार्वजनीक बांधकाम, जीएसटी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, सहाकार विभाग, अभियांत्रिकी महाविद्यालय, भूमिअखिलेख यासह अन्य विभागाच्या कर्मचार्यांनी आपआपल्या कार्यालयासमोर निदर्शने करून धरणे दिले. याच पद्धतीने तालुका स्थानावरही निदर्शने झाली. जिल्ह्यातले जवळपास ४२ हजार



कर्मचारी संपात सहभागी झाले आहे. हा संप बेमुदत आहे. संपामुळे शासकीय कार्यालयातील कामकाज थांबले आहे. याचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसला. कर्मचार्यांची भूमिका लक्षात घेता शुक्रवारी सुद्धा संप सुरूच राहण्याची शक्यता असून पुढे शनिवार व रविवार हे सुटीचे दिवस आहे. संप थांबला तरी सोमवार शिवाय कामकाज होणे नाही. **राजपत्रित कर्मचारी सहभागी**– नायब तहसीलदार ते उपजिल्हाधिकारी पर्यंत राजपत्रित अधिकारी सुद्धा समर्थन म्हणून एक दिवस संपात सहभागी झाले होते. त्यांच्याही त्याच मागण्या आहे. शुक्रवारी ते कामावर येणार आहे. अशा अधिकार्यांची जिल्ह्यात ९० संख्या आहे.

### वरूडात संपामुळे कामकाज प्रभावित

येथील सरकारी कर्मचारी सुद्धा बेमुदत आंदोलनात सहभागी झाले आहे. राष्ट्रीय पेन्शन योजना रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, या मागणीसह अन्य मागण्यांसाठी हे आंदोलन आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने २४ नोव्हेंबर रोजी शासनाला या बाबत निवेदन देवून कळवले होते व १४ डिसेंबर रोजी कामबंद करून संपावर जाण्याचा इशारा सुद्धा दिला होता. तरी देखील शासनाने दखल घेतली नाही. त्यामुळे कर्मचायांचे कामबंद आंदोलन सुरू झाले आहे.

# चार वर्षांनंतर कोणत्याही नव्या शाळेला अनुदान नाही

## शिक्षणमंत्री केसरकर यांचे विधान परिषदेत स्पष्टीकरण

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :** राज्य सरकारकडून शाळांना देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी १० हजार ६४३ शाळा पात्र ठरल्या आहेत. यापैकी ८,८२१ शाळांना अनुदान देण्यात आले असून, १,८२२ शाळा अपात्र ठरल्या आहेत. आवश्यक कागदपत्रे न दिल्याने या शाळा अपात्र ठरल्या असून, त्यांना ३१ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

पात्र शाळांना टप्प्याटप्प्याने २० टक्क्यांपासून १०० टक्क्यांपर्यंत येत्या चार वर्षांत अनुदान दिले जाईल. मात्र, त्यानंतर कोणत्याही नवीन शाळेला अनुदान दिले जाणार नाही. राज्यात केवळ सरकारी, अनुदानित आणि खासगी या तीनच प्रकारच्या शाळा उरतील, अशी माहिती शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी गुरुवारी दिली. विधान परिषद सदस्य विक्रम काळे, कपिल पाटील, ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावर मंत्री केसरकर यांनी अनुदानासाठी १,१६० कोटींची तरतूद केल्याचेही सांगितले.



विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी विविध शाळांच्या पातळीवर सखी सावित्री समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, अनेक शाळांनी यासंदर्भात पावले उचललेली नाहीत.शाळा किंवा केंद्रपातळीवर अशी समिती स्थापन न करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यात येईल. त्यांच्या मान्यतेचे नूतनीकरण होणार नाही, असेही केसरकर यांनी स्पष्ट केले. राज्यात एकूण ८६ हजार ९८७ सरकारी व अनुदानित शाळा आहेत. त्यापैकी ७५ हजार ९६२ शाळांमध्ये समिती आहे, असेही एका तारांकित प्रश्नात सांगितले.राष्ट्रीय शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांसाठी शाळांत १८ पायाभूत सुविधा अपेक्षित असतात. मात्र, ग्रामीण पातळीवर सर्वच शाळांत या सुविधा देणे शक्य नसते. त्यामुळे समूहशाळा करून त्यात त्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या समूह शाळांमुळे कोणत्याही शाळा बंद केल्या जाणार नाहीत. असा कोणताही निर्णय सरकारने घेतलेला नाही, असेही शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी स्पष्ट केले.

# कोळी महादेव समाजाचा विभागीय आयुक्त कार्यालयावर भव्य मोर्चा

## अनुसूचित जमात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्याची मागणी



**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

हेडिंग बोल्ड घेणे बातमी मांगे कलर बॉक्स

भारतीय संसद कायदा १९७६ अन्वये अमरावती विभागातील कोळी महादेव जमातीचे लोक अनुसूचित जमाती प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र घेण्यासाठी पात्र आहे. परंतु अमरावती विभागातील उपविभागीय अधिकारी व अनुसूचित जमाती पडताळणी समिती, अमरावती हे भारतीय संसद कायदा १९७६ च्या कायद्याचे उल्लंघन करून अमरावती विभागातील कोळी महादेव जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणीक सुविंधांपासून वंचीत ठेवीत आहे. जमातीच्या लोकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय लाभापासून वंचीत ठेवल्या जात आहे.त्यामुळे आक्रमक पावित्रा घेतलेल्या कोळी समाजाच्या वतीने आज विभागीय आयुक्त कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

कोळी महादेव जमातीच्या मागण्या पूर्ण करण्याकरीता राजेंद्र उर्फ बाबा जुवार व गजानन चुनकीकर हे दिनांक ०६ डिसेंबर २०२३ पासुन विभागीय आयुक्त कार्यालय (महसुल), अमरावती येथे उपोषणाला बसले आहे. उपोषणाला १० दिवस होवून सुध्दा सरकारने कुठलीही दखल घेतली नाही. त्यामुळे कोळी महादेव जमातीच्या मागण्यासंदर्भात आज इर्विन चौक ते विभागीय आयुक्त कार्यालय (महसुल) पर्यंत विराट निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये हजारोंच्या संख्येने कोळी महादेव जमातीचे लोक पारंपारिक दिंडीमध्ये सामील झाले आहे.

उपोषणकर्ते जुवार यांनी सांगितले की, विभागाचे उपविभागीय अधिकारी व अनुसूचित जमात तपास समिती हे भारतीय संसद अधिनियम १९७६ च्या नियमांचे उल्लंघन करत आहे. अमरावती विभागाचे कोळी महादेव जमात मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांपासून वंचित ठेवले जात आहे. तसेच जमातीतील नागरिकांना सामाजिक सुविधांपासून वंचित ठेवले जात आहे. त्यांना आर्थिक व राजकीय लाभा पासूनही वंचित ठेवले जात आहे. त्यामुळे ६ डिसेंबर पासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरू करण्यात आले आहे. मात्र, शासन प्रशासनाने अजून पर्यंत उपोषणाची कोणतीही दखल घेतली नसल्याने आज शुक्रवार १५ डिसेंबर रोजी कोळी समाज बांधवांच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला.

# अंतिम आठवड्यात तरी विदर्भाच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा होणार का?

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**



विधिमंडळाच्या हिवाळीअधिवेशनाचा दुसरा आठवडा संपत आला तरी विदर्भातील महत्त्वाचे प्रश्न व मुद्यांवर अद्याप सभागृहात चर्चा झालेली नाही. अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान व मराठा आरक्षण या दोन विषयांवरील ठरावावर सभागृहात वादळी चर्चा होत आहे. पुढील आठवड्यात या दोन्ही विषयांवर सरकारकडून उत्तर येणे बाकी आहे. त्यामुळे आता विरोधकांकडून अंतिम आठवडा प्रस्ताव तरी विदर्भाच्या प्रश्नांवर येणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नागपूर करारानुसार विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात होते. या अधिवेशनात विदर्भातील जास्तीत जास्त प्रश्नांवर चर्चा व्हावी, त्यातून मार्ग निघावा, सरकारकडून उपाययोजना जाहीर केल्या जाव्या, अशी अपेक्षा असते. मात्र, यावेळी अद्याप विदर्भाच्या प्रश्नांना हात घातलेला दिसत नाही. अलिकडच्या काळात विदर्भात नवे उद्योग आलेले नाहीत. बहुतांश एमआयडीसीमधील बहुतांश उद्योग डबघाईस आलेले आहेत. मिहान प्रकल्पानेही पाहिजे तशी गती घेतलेली नाही. नव्या रोजगार निर्मितीचा प्रश्न कायम आहे. विदर्भात आधीच औष्णिक वीज प्रकल्पामुळे प्रदूषणात वाढ झाली आहे. अशात आणखी कोराडी येथे विस्तारित वीज प्रकल्प येऊ पर्यावरणवाद्यांनी घातला आहे. या प्रकल्पाला कडाडून विरोध केला आहे.

विदर्भातील जिल्हाअंतर्गत रस्त्यांची स्थिती वाईट आहे. खड्डे पडले आहेत. ते दुरुस्तीसाठी निधीची गरज आहे विदर्भातील लघु सिंचन प्रकल्पांसाठी निधी देण्याची आवश्यकता आहे. मालगुजारी तलाव हे पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांची जीवनरेखा आहेत. या तलावांच्या दुरुस्तीस बळकटीकरणासाठी उपाय योजण्याची गरज आहे. कापूस हे विदर्भातील मुख्य नगदी पीक आहे. दिवसेंदिवस कापसाचे भाव पडत आहेत. कापूस उत्पादकांना अनुदान देऊन धीर देण्याची गरज आहे. अवकाळीने कापसाचे, सोयाबीन,तूर,धान पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. धानाल क्विंटलमागे एक हजार रुपये बोनर द्यावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे मात्र. या दिशेने अद्याप हालचाली नाहीत.

विदर्भातील संत्र्यावर प्रक्रिया करण्यासाठी तीन प्रकल्प उभारण्याची घोषणा झाली. प्रत्यक्षात काम सुरू झालेले नाही. या दिशेने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. अंतिम आठवडा प्रस्तावात हे विषय आल्यास विदर्भाला न्याय मिळू शकेल.अशी अपेक्षा आता विदर्भ वासीयांना आहे.

# १७ डिसेंबर पासून संत गुलाबराव महाराज भक्तीधामचा गीताजयंती महोत्सव

## २२ डिसेंबरला पुरस्कार प्रदान : तर २३ डिसेंबरला श्री चा दिंडी पालखी सोहळा

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक चांदुर बाजार**



संत श्री गुलाबराव महाराज सेवा संस्था बोराळा द्वारा संचालित स्थानिक भक्तीधाम चांदुर बाजार मध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही गीता जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे यावर्षी मोठ्या प्रमाणात हा अध्यात्मिक सोहळा साजरा केला जाणार आहे माऊलीच्या भक्तांसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे भक्तीधामच्या या गीता जयंती सोहळ्याला १७ डिसेंबर पासून प्रारंभ होत आहे तसेच या गीता जयंती सप्ताहात सात दिवस भागवत कथा ज्ञानयज्ञ सह किर्तन सोडा ही संपन्न होणार आहे या महोत्सवानिमित्त भक्तीधामवर महाराष्ट्रातील वारकऱ्यांची मादियावाडी पाहायला मिळणार आहे या उत्सवाचा शुभारंभ १७ डिसेंबरला सकाळी सहा वाजता मुख्य वर्जन मानाने हस्ते मंगल कलशाचे स्थापनेने होणार आहे उत्सवाच्या दैनंदिन कार्यक्रमात पहाटे पाच ते सहा काकडा आरती सकाळी सहा ते सात योगासने सकाळी सात ते नऊ सामूहिक ज्ञानेश्वरी पारायण सकाळी दहा ते अकरा गाथा भजन तसेच सोहळ्यातील मुख्य कार्यक्रम भागवत कथा दुपारी दोन ते पाच यावेळी संपन्न होणार आहे कथा निरूपण हरिभक्त परायण भागवताचार्य गोविंद महाराज जाटदेवळेकर पाथर्डी हे करणार आहे तसेच सायंकाळी सहा ते सात हरिपाठ व तर रात्री सात ते नऊ वेळेत हरिकीर्तन सोहळा संपन्न होणार आहे १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या हरिकीर्तन महोत्सवात २२ डिसेंबरला सकाळी ११ ते १२ दरम्यान जिल्ह्यातील उत्कृष्ट सेवक यांना पुरस्कार पदान सोहळा संपन्न होणार आहे या सोहळ्यात ज्ञानेश्वर कन्या पुरस्कार, शहीद स्मृती पुरस्कार ,उत्तम शेतकरी पुरस्कार ,युवा शेतकरी पुरस्कार ,महिला शेतकरी पुरस्कार, हा सर्व पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात येणार आहे दिनांक २३ डिसेंबरला मोक्षदात एकादशीचे दुपारी दोन वाजता संत गुलाबराव महाराजांच्या दिंडी पालखी सोहळ्याचा पारंभ होईल या पालखीची वारकरी भक्ताचा नगर प्रदक्षिणा संपन्न होणार आहे तसेच दिनांक २४ डिसेंबरला सकाळी नऊ ते १० या दरम्यान कीर्तन होईल याच दिवशी सकाळी साडेदहा ते अकरा दरम्यान वैष्णव पूजन संपूर्ण होणार आहे त्यांचा दुपारी १२ ते चार दरम्यान महाप्रसादाचे गीता जयंती महोत्सवाची सांगता होईल.

# छत्री तलाव पासून भानखेडा मार्ग राहणार सात दिवस बंद

## शिव महापुराण कथेनिमित्य पोलीस प्रशासनाचा निर्णय

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शिव महापुराण कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या भाविकांची व वाहनाची संख्या लक्षात घेता खबरदारी म्हणून १५ डिसेंबरला सकाळी ८ वाजतापासून ते २१ डिसेंबरला रात्री ८ वाजेपर्यंत छत्रीतलाव चौक ते भानखेडा (बु) वाय पाईंट मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त सागर पाटील यांनी निर्गमित केले आहे.

हनुमान चालीसा चॅरीटेबल ट्रस्ट हनुमान गढी भानखेडातर्फे उद्या१५ डिसेंबरपासून कथावाचक पं.प्रदिप मिश्रा (सिहोर, मध्यप्रदेश) यांचा शिव महापुराण कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होणार असून वाहनांची संख्या पाहता वाहतुक शाखेने विशेष बंदोबस्त तैनात केला आहे. वाहन पार्कीगची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. १५ ते २१ डिसेंबरपर्यंत छत्री तलाव चौक ते भानखेडा (बु) वाय पाईंट मार्ग सर्व लहान मोठ्या वाहनाकरिता बंद राहणार आहे. कार्यक्रमस्थळी आलेल्या वाहनांना कार्यक्रम संपल्यानंतरच बाहेर जात येईल, कार्यक्रमादरम्यान कोणतेही वाहन ये-जा करणार नाही.




### पार्किंगची व्यवस्था

राजापेठ, यशोदानगर, बडनेराकडून येणाऱ्या सर्व भावीकांच्या ट्रॅव्हल्स, लहान ट्रॅव्हल्सची पार्कीग व्यवस्था तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसकरीता डेपो पार्कीग व्यवस्था मनोर मांगल्य शेजारी, हनुमान गढी कार्यक्रम स्थळासमोर मुख्य पार्कीग, मातोश्री वृध्दाश्रम समोर, भानखेडा येथील जवादे यांच्या शेतात पार्कीगची व्यवस्था करण्यात आली.

### ६०० कर्मचारी व अधिकारी तैनात

शिव महापुराण कार्यक्रमाच्या बंदोबस्तावर पोलीस आयुक्त डॉ. नवीनश्चंद्र रेड्डी स्वतः लक्ष ठेवून आहेत. बंदोबस्तात १ डिसीपीसह ३ सहाय्यक पोलीस आयुक्त, १२ पोलीस निरीक्षक, ६० सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक आणि ५५० महिला व पुरुष कर्मचारी तैनात राहणार आहेत. वाहतूक शाखेचे कर्मचारी सकाळपासून कार्यक्रमस्थळापासून तर सर्व पार्कीग स्थळावर तैनात राहतील. ये-जा करणाऱ्या मार्गावर प्रत्येक ठिकाणी वाहतूक कर्मचारी तैनात राहणार आहेत.

### जाणाऱ्यांकरिता पर्यायी मार्ग

लालखेड-मालखेड (बु) मार्गे अमरावती शहराकडे येणारी वाहनांना भानखेडा वाय पाईंट ते कोंडेश्वर टी पाईंट (सुपर हायवे), तसेच अलमास मेट बड़नेरा-गोपाल नगर चौक मार्गे शहरात येतील.दस्तुरनगर ते छत्री तलाव येथून भानखेडा- लालखेड, मालखेडकडे जाणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्ग चपराशीपुरा, वडाळी नाका, भानखेडा (बु) वाय पाईंट या मार्गाचा वापर करावा लागेल.

### पार्किंगला बंदी

छत्रीतलाव ते हनुमान गढी मुख्य मार्ग, हनुमान गढी ते भानखेडा वाय पाईंट, भानखेडा वाय पाईंट ते कोंडेश्वर मंदिर, छत्रीतलाव चौक ते दस्तुरनगर, फरशी स्टॉप, राजापेठ उड्डाणपुल, यशोदा नगर चौक ते दस्तुरनगर चौक, एमआयडीसी जुना बायपास, गौरी ईन ते अकोला वाय पाईंट, छत्री तलाव चौक ते मंगलधाम कॉलनी ओव्हर ब्रिजपर्यंत यासर्व रोडच्या कडेला कोणत्याही प्रकारची वाहने पार्कीग करण्यास मनाई आहे.

रक्तदान ही जनसामान्यांची सेवा, यालाच मानूया ईश्वरसेवा.

# भटकंती करणाऱ्या टोळीने अल्पवयीन मुलीला पळवले चटई,झुंबर विकण्याचा करायचे व्यवसाय

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ**

वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्य करून चटई, आणि झुंबर विक्री करणाऱ्या एका भटक्या टोळीने ठिय्या शेजारी राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याची घटना सोमवारी उघडकीस आली. याबाबत नांदगाव पेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून चार दिवस उलटूनही त्या मुलीचा शोध लागला नाही. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार एक महिनापूर्वी बाळापुरे ले आउट मधील रिकाम्या जागेवर आशिष दीपक राऊत या विवाहित व्यक्तीने आपल्या कुटुंबासह तंबू ठोकून तेथून चटई आणि झुंबर विक्रीचे काम करत होता. आशिष यांचे संपूर्ण कुटुंब या व्यवसायात होते. महिला वर्ग चटई आणि झुंबर तयार करायचे आणि आशिष आणि त्याचा भाऊ दोघे वाहनाने नांदगाव पेठ तसेच आजूबाजूच्या परिसरात जाऊन चटई आणि झुंबर विक्रीचे काम करायचे. आशिष ने ज्या ठिकाणी तंबू ठोकला होता त्या बाजूला असलेल्या घराशी त्याने ओळख निर्माण केली होती.सोमवारी सकाळी घरातील सदस्य झोपेतून उठल्यावर त्यांना घरात मुलगी दिसली नाही त्यामुळे त्यांनी शेजारी व नातेवाईक यांच्याकडे विचारणा केली मात्र कुठेच आढळून न आल्याने त्यांनी घराजवळ असलेल्या तंबू कडे जाऊन बघितले तर तेथून तंबू आणि त्यामध्ये राहणारे सर्व लोकांनी पलायन केल्याचे दिसून आले.कुटुंबियांना शंका येताच त्यांनी तातडीने नांदगाव पेठ पोलिसांत जाऊन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार दाखल केली. अद्याप पोलिसांना त्या मुलीच्या शोध लागला नाही मात्र पोलीस याप्रकरणी तपास करीत असल्याचे पो.नि. प्रवीण काळे यांनी सांगितले.



**भटक्या लोकांवर अंकुश हवा**

नांदगाव पेठ मध्ये विविध व्यवसायाच्या निमित्ताने अनेक भटके लोक कुटुंबासह येतात आणि मिळेल त्या ठिकाणी आपला तंबू ठोकून वास्तव्य करतात. आजच्या या घटनेने या भटक्या लोकांवरील विश्वास कमी झाला असला तरी या लोकांची माहिती पोलिसांकडे असायला हवी शिवाय यांच्यावर पोलिसांचा अंकुश असावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# उद्या विदर्भ राज्य आंदोलन समितीची महत्वाची बैठक

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**




विदर्भ राज्य आंदोलन समितीची जिल्हा बैठक शनिवार, १६ डिसेंबर रोजी काँग्रेसनगर मार्गावरील ताजने सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. विदर्भ राज्य आंदोलन समितीचा विदर्भ संकल्प मेळावा २० डिसेंबर रोजी अकोला येथे होणार आहे. तसेच २७ डिसेंबर रोजी संविधान चौक, नागपूर येथे वेगळ्या विदर्भाच्या मागणीकरिता विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष माजी आमदार वामनराव चटप, संपादक प्रकाश पोहरे, विदर्भ राज्य महिला आघाडी अध्यक्षा रंजना मामडे, अरुण केदार, युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासूरकर उपोषणाला बसणार आहे. त्या संदर्भात ही महत्त्वपर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला माजी आ. वामनराव चटप मार्गदर्शन करणार आहेत. या बैठकीला विदर्भ राज्य आंदोलन समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विदर्भप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रंजना मामर्डे, राजेंद्र आगरकर, रियाज खान, दिलीप भोयर, सुनील साबळे, माधवराव गावंडे, चेतन परडके, सतीश प्रेमलवार, डॉ. विजय कुबडे, रहेमानभाई, अफसरभाई, मनोज पोपटानी, हर्षा सगणे, सरला सपकाळ, अशोक हांडे, बाबाराव जाधव, दिनकर निस्ताने, दिनेश ढवस, विष्णू काळमेघ, रविकांत आढाऊ, सुरेश जोगी, अनिल वानखडे, आशिष देशमुख, डॉ. निळकंठ यावलकर, पांडुरंग बिजवे, सचिन ढगे, गजानन दुधाट, इब्राहिम खाकसे, जानराव मनोहरे, दिगंबर चुनडे, रेखा माहोरे, धनराज गोटे, साहेबराव इंगळे, रामदास डवले यांनी केले आहे.

# हर..हर... महादेव.... अमरावती शहर झाले शिवमय.....



हनुमान चालिसा चॅरीटेबल ट्रस्टतर्फे १६ ते २० डिसेंबरदरम्यान हनुमानगढी येथे आयोजित शिवमहापुराण कथेच्या निमित्याने आज अमरावती शहरातील जिल्हा स्टेडीयम येथून दुपारी १ वाजता सुमारे एक लाख महिलांची ऐतिहासिक कलश यात्रा काढण्यात आली ही कलश यात्रा इर्विन चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, राजापेठ उडाणपूल, कवर नगर की स्टॉप, दस्तुर नगर, छत्री तलाव मार्ग श्री हनुमान गढी येथे पोहचली,शहरातील प्रत्येक चौकात या कलश यात्रेचे जोरदार स्वागत करण्यात आले. हनुमान चालीसा चॅरिटेबल ट्रस्ट, आमदार रवी राणा व खासदार नवनीत राणा यांच्या वतीने हनुमान गढ़ी येथे १११ फूट उंच प्रभू श्री हनुमानजी मूर्ती उभारण्यात येत आहे. श्री राम जन्मभूमी अयोध्या, हनुमान गढ़ी वेचून भक्ती-शक्ती कलशात आणलेली माती या भूमिपूजन समारंभात वापरली जाणार आहे.उद्या पासून कथेला प्रारंभ होणार असून संपूर्ण जिल्हा शिवमय झाला आहे.

## लोकप्रतिनिधींना गावबंदी करणं हा गुन्हा आहे त्याला एक महिना शिक्षा : छगन भुजबळ

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लोकप्रतिनिधींना गावबंदी करणं हा गुन्हा आहे. त्याला एक महिना शिक्षा झाली पाहिजे, असे वक्तव्य छगन भुजबळांनी केली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या सरकारला देण्यात आलेल्या इशाऱ्यावर देखील भुजबळांनी टीका केली आहे. या तारखेपर्यंत द्या आणि त्या तारखेपर्यंत द्या म्हणजे ब्लॅकमेलिंग नाही तर आणखी काय आहे? सरकारने तीन तीन न्यायाधीश बसवले आहे वाट पाहा, असा सल्ला देखील जरांगेंनी दिला आहे. मी अनेक मोठे मोठे लोकं अंगावर घेतले आहे. तू किस झाड की पत्ती आहे, असे म्हणत जरांगेच्या टिकेला प्रत्युत्तर दिले आहे. २४ डिसेंबरला हल्ला करण्याची



आणि घर जाळण्याची तयारी सुरु असल्याचा आरोप मंत्री भुजबळांनी विधानसभेत जरांगेंवर केला आहे.

समाज माध्यमावरील मेसेजही वाचून दाखवला आहे. प्रकाश सोळंकी, संदीप क्षीरसागर यांची घरं जाळली त्याप्रमाणेच माझंही घर जाळलं जाईल भुजबळांनी भीती व्यक्त केली आहे. मराठा आरक्षणासाठी सरकार प्रयत्न करत आहे. बीडमध्ये अनेकांची घरं,कार्यालय ऑफिस कट करून पेटवण्यात आली. यात जीवितहानी होण्याची शक्यता आहे मात्र ते वाचले, असे भुजबळ म्हणाले.

गावबंदीमुळे आमदार खासदार यांना गावात जाण्यापासून मज्जाव करण्यात आला आहे. त्यांना काम करू दिले जात नव्हते . हा गुन्हा आहे याला एक महिन्याची शिक्षा देखील आहे. एकदा ओबीसीमध्ये आल्यानंतर शैक्षणिक आणि राजकीय आरक्षण लागू होणार आहे. ओबीसीमध्ये आलात तर त्याला सर्व लाभ मिळतात. ओबीसी आरक्षणाला धक्का बसणार नाही पण धक्का बसणारच आहे. सरसकट प्रमाणपत्र दिले म्हणजे ओबीसीमध्ये आले. बहुतांश लोकं मलाच दोषी धरत आहे. मी पूर्ण मराठा समाजाला दोष देत नाही, पण काहींची झुंडशाही सुरू आहे, दादागिरी करत आहे त्यांच्या विरोधात आहे, असेही भुजबळ म्हणाले.

## जरांगे पाटलांचा सरकारला पुन्हा अल्टिमेटम

### २४ डिसेंबरपर्यंत आरक्षण मिळालं नाही तर पुढं काय? अंतरवाली सराटीत ठरणार रणणिती



**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक जालना**

मराठा आरक्षणाबाबत काय निर्णय घेतला ते १७ डिसेंबरपर्यंत सांगा, असा अल्टिमेटम मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे. येत्या १७ तारखेला महाराष्ट्रातील सगळ्या मराठा समाजाची अंतरवाली सराटीत बैठक बोलावली आहे. जर २४ डिसेंबरपर्यंत आरक्षण मिळालं नाही तर पुढील दिशा काय? त्यावर चर्चा करण्यासाठी ही बैठक बोलावल्याची माहिती जरांगे पाटील यानी दिली. दरम्यान, जरांगे पाटील यांनी मंत्री छागन भुजबळ यांच्यवर देखील टीका केली. मराठा आरक्षणाच्या विरोधात त्यांनी बोलू नये, त्यांनी खुशाल झोपावं, त्यांनी संरक्षण घ्यावं,असं म्हणत जरांगे पाटील यांनी नाव न घेता भुजबळांवर निशाणा साधला.

१७ डिसेंबरपला आंतरवाली सराटीत सकाळी ९ वाजता बैठक होणार आहे. १२ वाजेपर्यंत सर्वांचा परिचय होईल.२४ डिसेंबरपर्यंत आरक्षण मिळालं नाही तर पुढील दिशा काय? त्यावर १२ ते ३ वाजता चर्चा होईल,असे जरांगे पाटील यांनी सांगितलं. अंतरवालीला जिथे सभा झाली होती तिथे बैठक होणार आहे.

## तुमच्या अंगणातले झाड तोडायचे असले तरी घ्यावी लागते परवानगी

### सर्रास केली जातेय वृक्षतोड : अनेकांना नियमाचीच नाही माहिती

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

घराच्या अंगणातील असो की, सार्वजनिक ठिकाणचे झाडे तोडायचे झाले तर नगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागते. पण, या नियमाची अनेकांना माहितीच नसल्याने सर्रास झाडे तोडली जातात. विशेष म्हणजे, त्याविरुद्ध कारवाईदेखील होत नसल्याने सर्व मामला अलबेल आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत प्रयत्न केले जातात. त्यासाठी वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना प्रत्येक ठिकाणी केली जाते. कोणतेही झाड तोडायचे असल्यास या समितीची परवानगी घ्यावी लागते. मात्र, घरासमोरील झाडे विनापरवानगीच तोडली जातात. त्याबद्दल कोणी



तक्रारही करीत नाही आणि पालिकेकडून कारवाईदेखील होत नाही. वनविभागाचीदेखील परवानगी घ्यावी लागते.

**कोणत्या कारणासाठी झाड तोडता येते?**

झाड तोडण्यासाठी सक्षम कारण समितीकडे द्यावे लागते. त्यात बांधकामात अडथळा येत असेल किंवा सार्वजनिक ठिकाणी एखाद्या विकासकामात अडथळा निर्माण होत असेल तर त्यासाठी झाड तोडण्याची परवानगी मागता येते.


**कोठे मिळते परवानगी?**

वनविभाग, नगरपालिका आणि ग्रामपंचायतीत ही परवानगी मिळते. त्यासाठी स्थापन केलेल्या समितीकडे रितसर अर्ज करावा लागतो.

**...तर होईल गुन्हा दाखल**

कोणतेही झाड विनापरवानगी तोडले तर संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. स्थानिक स्वराज्य संस्था प्रशासन यासंदर्भातील कारवाई करु शकते.

## घर सोडण्याची वेळ आलीय...; संसदेत घुसखोरी करणाऱ्या सागरची सीक्रेट डायरी समोर



**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

संसदेत घुसखोरी करणाऱ्या सागर शर्माच्या लखनौच्या घरातून पोलिसांना एक सीक्रेट डायरी सापडली आहे. या डायरीतून अनेक गुपितं उघड होण्याची शक्यता आहे. घर सोडण्याची वेळ आली आहे, असं सागरने आपल्या डायरीत लिहिलं आहे. सागरने आपल्या डायरीत लिहिलं की, घर सोडण्याची वेळ जवळ आली आहे. एका बाजूला भीती तर दुसरीकडे मनामध्ये काहीही करण्याची आग धगधगत आहे. मी माझ्या पालकांना माझी परिस्थिती समजावून सांगू शकलो असतो तर बरं झालं असतं. संघर्षाचा मार्ग निवडणं माझ्यासाठी सोपं नव्हतं. प्रत्येक क्षणी आशा आहे. मी ५ वर्षे वाट पाहत होतो की एक दिवस येईल जेव्हा मी माझ्या कर्तव्याकडे जाईन. जगातील सर्वात शक्तिशाली व्यक्ती तो नाही ज्याला कसं हिसकावून घ्यायचं हे माहीत आहे, तर सर्वात शक्तिशाली व्यक्ती तो आहे ज्याच्याकडे सुखाचा त्याग करण्याची क्षमता आहे. दोन तरुणांनी संसदेत घुसखोरी केली होती. दोन्ही तरुणांनी व्हिजिटर गॅलरीतून उडी मारली. हे दोघे जण एका बाकावरून दुसऱ्या बाकावर धावू लागले. त्यानंतर एका व्यक्तीने त्याच्या बुटातून पिवळा स्प्रे काढला आणि फवारणी केली. यावेळी संसदेत गदारोळ झाला. खासदारांची इकडे-तिकडे धावपळ सुरू झाली. मात्र, काही खासदारांनी त्यांना पकडून सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या ताब्यात दिले. सागर (शर्मा) आणि मनोरंजन डी (म्हैसूर) अशी त्यांची नावे आहेत. लोकसभेच्या आत दोन लोकांनी उडी मारली, तेव्हा संसदेबाहेर निदर्शने करत असताना पोलिसांनी एक पुरुष आणि एका महिलेला अटक केली. दोघेही स्प्रे फवारत होते आणि घोषणा देत होते.

## बेरोजगारांची थट्टा, काय दिवे लावले?; पकोडे तळत विरोधकांचे विधानभवन परिसरात आंदोलन

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

विधिमंडळाचया अधिवेशनाच्या सातव्या दिवशी विरोधकांनी बेरोजगारांची थट्टा करणाऱ्या सरकारचा निषेध करत विधानभवन परिसरात पकोडे तळले. यावेळी सत्ताधाऱ्यांविरुद्ध जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

'पेपरफुटी झाली, काय दिवे लावले', 'भरतीची घोषणा, काय दिवे लावले', 'बेरोजगारी वाढली, काय दिवे लावले,' 'पीएचडीधारकांची थट्टा, काय दिवे लावले', अशा घोषणा देत विरोधकांनी शुक्रवारी विधानभवन परिसर दणाणून सोडला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'पीएचडी करून काय दिवे लावणार' असे वक्तव्य केले होते. त्यावरून त्यांच्यावर बरीच टीका झाली. त्यांचे वाक्य बरेच ट्रोल झाले. त्यानंतर त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. तसेच माझ्या बाजूने हा विषय




संपल्याचे जाहीर केले आहे. मात्र, विरोधकांनी त्यांच्या 'काय दिवे लावले' या वाक्याला धरून शुक्रवारी बेरोजगारीच्या मुद्द्यावर जोरदार आंदोलन केले. यावेळी आंदोलनात विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, रवींद्र धंगेकर, सचिन अहिर, सतेज पाटील, रोहित पवार, के. सी. पाडवी आदींचा सहभाग होता.

**बेरोजगारीवर सरकार गंभीर नाही**

सर्वच परीक्षांमध्ये पेपरफुटी वाढली आहे. सरकार यावर कुठलीही कारवाई करत नसल्याचे चित्र आहे. मोदींची गॅरंटी म्हणून सरकारचे मंत्री सांगताहेत तशी गॅरंटी बेरोजगारी हटविण्यासाठी देणार का, असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केला. सरकार बेरोजगारीच्या मुद्द्यावर गंभीर नाही. रोजगार देण्याऐवजी पकोडे तळण्याचा सल्ला सरकार देत आहे. त्यामुळे पकोडे तळून सरकारचा निषेध करण्यात आला आहे, असे दानवे यांनी सांगितले.

## महिला न्यायमूर्तींचं लैंगिक शोषण, पत्रातून सरन्यायाधीशांकडे मागितली मरणाची परवानगी; म्हणाल्या, मला कचऱ्याप्रमाणे!

**दि. १५ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

महिला सशक्तीकरणाच्या कितीही चर्चा झाल्या, तरी अद्याप महिलांवर होणारे अत्याचार कमी करण्यात आपल्याला यश आलेलं नाही. या महिलांसाठी देशाची न्यायव्यवस्था हा एक मोठा आधार आहे. न्यायालयांपर्यंत पोहोचलेल्या महिलांना काही प्रमाणात का होईना, दिलासा मिळाल्याची अनेक उदाहरणं नक्कीच आहेत. पण चक्क एका महिला न्यायाधीशांनाच लैंगिक शोषणाचा सामना करावा लागत असून त्यांनाच न्याय न मिळाल्यामुळे त्यांनी थेट देशाच्या सरन्यायाधीशांकडे मरणाची परवानगी मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. उत्तर प्रदेशातील हे प्रकरण असून वरीष्ठ न्यायमूर्तींकडून लैंगिक शोषण झाल्याचे धक्कादायक आरोप या न्यायाधीशांनी केले आहेत. इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं सविस्तर वृत्त दिलं आहे.